अंतरंग - पान ६




# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ५५ वा ❑ भारतीय सौर दिनांक १५ चैत्र शके १९४८, रविवार दि.०५ एप्रिल २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## ‘महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६’ राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

### बेस्ट प्रॅक्टीसेस ऑफ गोंडवाना युनिव्हर्सिटी’ या पुस्तिकेचे प्रकाशनही संपन्न




ज्योतिर्मय साहित्य

नागपूर : वैश्विक ज्ञानाचे भारतीयीकरण व भारतीय ज्ञानाचे वैश्विकरण करणे, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. केवळ ऐतिहासिक बाबींचा गौरवपूर्ण उल्लेख करुन आपण महान होणार नाही, तर यासह वर्तमान आणि भविष्याची वैश्विक आव्हाने लक्षात घेऊन त्यानुसार शैक्षणिक पद्धतीला दिशा द्यावी लागेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज येथे केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, विश्वेश्वरैया राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था, आयआयएम नागपूर आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, नवी दिल्ली या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने व्हीएनआयटी येथे ‘महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६ : विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण’या राष्ट्रीय परिषदेच्या उद्धाटन सत्राचे विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. याप्रसंगी शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, आयआयएम नागपूरचे संचालक भीमराया मेत्री, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु प्रशांत बोकारे, व्हीएनआयटीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष मदाभूशी मदन गोपाल, संचालक डॉ. प्रेमलाल पटेल, लघु उद्योग भारतीचे रवनीत खुराना या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज जग अत्यंत वेगाने पुढे जात आहे. पहिली औद्योगिक क्रांती १७६० मध्ये आली होती. त्यानंतरच्या आलेल्या तीन औद्योगिक क्रांतींचा काळ हा सुमारे अडीचशे वर्षांचा आहे. मात्र, मागील पंधरा वर्षांतच तीन औद्योगिक क्रांतींचा अनुभव जगाने घेतला आहे. बदलांची गती लक्षात घेतली नाही, तर आम्ही मागे राहू शकतो. या क्रांतीला गती देणारे ‘एआय’आणि ‘डीप टेक्नॉलॉजी’च्या विकासात भारतीयांचे अत्यंत मोलाचे योगदान राहिले आहे. आम्हाला शैक्षणिक धोरणातून असे मानव संसाधन घडवायचे आहे, ज्यात व्यक्तीमध्ये सर्वंकष विकासासह नैतिक व व्यावसायिक गुणांचे रोपणही अपेक्षित आहे. भौतिक, नैतिक, शारीरिक क्षमतेसह व्यावसायिक म्हणून ती व्यक्ती देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देणारीही ठरावी, अशी अपेक्षा आहे. जागतिक ज्ञान आणि भारतीय ज्ञान व्यवस्थेचा मेळ साधणारी आणि जागतिक आव्हानांचा सामना करणारी शिक्षण पद्धती आम्हाला विकसित करायची आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

मुख्यमंत्री म्हणाले, साठ टक्के नोकऱ्यांचे स्वरुप येत्या एक हजार दिवसांमध्येच बदलणार आहे. डीप टेक व एआय तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढेल, असा याचा अर्थ नाही. देशात संगणक क्रांती आली, त्यावेळीही अशीच चर्चा सुरु झाली होती. मात्र, आम्ही त्या क्षेत्रातही आमचा ठसा उमटविला होता. तंत्रज्ञान कधीच थांबत नाही. अशावेळी तंत्रज्ञानासोबत आपणही पुढे जाण्याची गरज आहे. विद्यापीठे तसेच शिक्षकांनी आजच्या काळात कुठले विषय सुसंगत व अनुरूप आहेत, याचाही विचार करण्याची गरज आहे. पंधरा वर्षात तीन औद्योगिक क्रांती येणार असतील, तर समाजात काहीही स्थायी राहू शकत नाही. प्रत्येकाला नव्या पद्धती स्विकाराव्या लागतील व शैक्षणिक क्षेत्र त्यासाठी अनुकूल करून घ्यावे लागेल आणि ज्ञानाचा प्रवाह पुढे न्यावा लागेल, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

विदेशी विद्यापीठांना आम्ही अनुकूल नव्हतो, असाही एक काळ होता. कारण त्यावेळी आम्ही त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नव्हतो. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. नवी मुंबईत आम्ही एज्युसिटी विकसित करत आहोत. त्यात अनेक विदेशी विद्यापीठाचे शिक्षण कमी खर्चात घेण्याची संधी आमच्या मुलांना उपलब्ध होणार आहे. आमच्या विद्यापीठांनीही या स्पर्धेत उतरून शिक्षणाचा तो स्तर गाठायला हवा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याप्रसंगी मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते एका स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे ‘बेस्ट प्रॅक्टीसेस ऑफ गोंडवाना युनिव्हर्सिटी’ या पुस्तिकेचे प्रकाशनही याप्रसंगी पार पडले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर यांनी आभार मानले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशभरातील शिक्षण व उद्योग क्षेत्राशी निगडित तज्ज्ञ आणि प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातून विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण या थीमवर आधारित महाराष्ट्र ज्ञान सभेचे हे आयोजन होत आहे.

## विशेष लेख...

### एआयमुळे लाखो नोकऱ्या धोक्यात?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

कृत्रिम बुद्धिमत्ता कामाची व्याख्या झपाट्याने बदलत आहे. जी कामे पूर्ण करायला पूर्वी तास लागायचे, ती आता काही मिनिटांत पूर्ण होऊ शकतात. तुम्हाला एखाद्या विषयावर माहिती हवी असो, निबंध लिहायचा असो, आकडेमोड करायची असो किंवा ईमेल लिहायचा असो, अशी हजारो कामे काही मिनिटांत पूर्ण करू शकते. यामुळे लोकांचे त्यावरचे अवलंबित्व लक्षणीयरीत्या वाढले आहे, परंतु त्यासोबतच एक धोकाही निर्माण होत आहे, ज्यावर अनेकदा चर्चा केली जाते.

एआय माणसांची जागा घेऊ शकते का? एआयच्या आगमनाने लोकांच्या नोकऱ्या धोक्यात आहेत का? असे अनेक प्रश्न तुमच्या मनात येत असतील. याचे उत्तर इतके सोपे नाही. एआय माणसांची जागा घेऊ शकत नाही, पण ते निश्चितपणे काही नोकऱ्या कमी करू शकते.

अमेरिकेतील ओरॅकल या बहुराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपनीने जगभरातील आपल्या शाखांमधून कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात कपात केली. अचानक घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी खळबळ उडाली. या नोकरकपातीचा मोठा फटका भारतीयांनाही बसल्याचे दिसून आले. भारतातील सुमारे ११,००० ते १२,००० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केल्याचे ओरॅकलने सांगितले.

ओरेकलने घेतलेला नोकरकपातीचा निर्णय हा केवळ एकट्या कंपनीपुरता मर्यादित नसून संपूर्ण जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात सध्या अशीच प्रवृत्ती दिसून येत आहे. अनेक दिग्गज कंपन्यांनी नोकरकपातीला सुरुवात केली असून एआय आधारित तंत्रज्ञानावर अधिकच लक्ष्य केंद्रित केले आहे. उद्योगातील अंदाजानुसार, यावर्षी विविध तंत्रज्ञान कंपन्यांनी हजारो नोकऱ्यांची कपात केली आहे. या कंपन्यांचे मुख्य उद्दिष्ट केवळ खर्च कमी करणे नसून, एआय आधारित भविष्यासाठी स्वतःला सज्ज करणे असा आहे. जागतिक कंपन्यांची मोठी तंत्रज्ञान विकास केंद्रे भारतात असल्याने अशा प्रकारच्या पुनर्रचना मोहिमांचा देशातील नोकरदारांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

भारत हा जागतिक स्तरावर अभियांत्रिकी आणि सेवांचा प्रमुख केंद्र राहिला असला तरीही आता स्वयंचलित तंत्रज्ञानाकडे वाढणाऱ्या ओघामुळे नोकरभरतीचे स्वरूप बदलू लागले आहे. त्यातच नोकरकपातीमुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासासाठी लागणारी प्रचंड भांडवली गुंतवणूक आणि सॉफ्टवेअर उद्योगाला आजवर बळ देणारे मनुष्यबळ यांच्यातील ताण समोर येत आहे. हा बदल आता जागतिक तंत्रज्ञान क्षेत्राच्या पुढील टप्प्याची ओळख ठरत असून, उद्योगाच्या भविष्यातील दिशेला आकार देणारा ठरत आहे. ओरॅकलने भारतात केलेली नोकरकपात ही कंपनीच्या जागतिक स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या कपातीचा एक भाग असल्याचे सांगितले जात आहे. या प्रक्रियेत जगभरातील सुमारे ३०,००० कर्मचाऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

ओरॅकलने आपली पारंपारिक व्यावसायिक रचना बदलून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे. तज्ज्ञांच्या मते, कंपनी सध्या पारंपरिक सॉफ्टवेअर आणि अंतर्गत कामकाजाचे स्वरुप बदलून एआय आधारित डेटा सेंटर्स उभारण्यासह क्लाउड सेवा विस्तारण्यावर भर देत आहे. ॲमेझॉन आणि अल्फाबेट यांसारख्या दिग्गज कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी ओरॅकलने आपल्या क्लाउड पायाभूत सुविधांचा झपाट्याने विस्तार सुरू केला आहे. यामध्ये नवीन डेटा सेंटर्स उभारणे आणि मोठ्या एआय मॉडेल्सना प्रशिक्षण देण्यासाठी व चालवण्यासाठी आवश्यक संगणकीय क्षमता वाढवणे यांचा समावेश आहे. या बदलातील सर्वात महत्त्वाचा भाग स्टारगेट हा एआय इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प असल्याचे सांगितले जात आहे. आगामी काळात एआय कामाचा भार पेलू शकेल अशी डेटा सेंटर्स विकसित करणे, हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी कंपनीकडून काही वर्षांत शेकडो अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली जाणार आहे.

तथापि, एआयच्या आगमनाचा अर्थ नोकऱ्या कमी होणे असा होत नाही. जर आपण तंत्रज्ञान आणि एआयच्या बाबतीत अद्ययावत राहिलो नाही, तर नोकऱ्या धोक्यात आहेत. एआयमुळे नोकऱ्यांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, आपण नवीन कौशल्ये शिकत राहणे आणि अद्ययावत राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## लाटांबरोबरचे दिवस : अलिबाग




ज्योतिर्मय साहित्य

‘‘शीतल, मुलं पण सोबत आली असती ट्रिपला तर छान झालं असतं.‘‘, माझी मैत्रिण फोन वर बोलत होती. तिच्या धाकट्या मुलीची परीक्षा होती. आणि माझ्या मुलीला ऑफिस कामामुळे जमणार नव्हतं. शेवटी तिची लेखी परीक्षा झाल्यावर जमेल का? तेंव्हा सुटी मिळेल का हे पाहून तसे ठरवले. मुलं पण सोबत येणार म्हणुन आम्ही खुश झालो. दहा मिनिटात परत मैत्रिणीचा फोन आला. रिसॉर्ट बूक झाले का? कीर्तीची (तिची मुलगी) प्रॅक्टिकल एक्झाम आहे. त्यामुळे ती नाही येणार. परत आमचा हिरमोड झाला. शेवटी मी तिला समजावले आपली मुलं आता मोठी झाली आहेत. सगळ्यांच्या वेळा एकत्र जमणं अवघड आहे. त्यांना पुढच्या वेळी घेऊन जाऊ. शेवटी आम्ही चौघे जायचे ठरले. (मी, माझे यजमान, माझी मैत्रीण आणि तिचे यजमान).

यावेळी पिकनिक साठी अलिबाग ला जायचं ठरलं होतं. बीच वर जाऊन बरीच वर्षे झाली होती. त्यामुळे अलिबागला मनसोक्त बीच चा आनंद घ्यायचा ठरवले. मुलांना सोडून आमची ही पहिलीच ट्रीप होती. त्यामुळे चुकल्यासारखं वाटत होतं. पण आता मुलांचे प्लॅन्स वेगळे असणार आहेत. आणि आपल्याला अशी सवय करावी लागणार आहे. असा विचार करत होतो.

पुण्याहून अलिबागला कारने जायचं ठरलं. यावेळेस माझी मैत्रीणही सोबत असल्याने मी अजूनच खुश होते. एक छानसा व्हीला बुक केला. फार धावपळ न करता निवांत क्षण घालवायचे हे आधीच ठरलं होतं.

उत्साहात आम्ही निघालो. गप्पा मारत निम्मा रस्ता कधी संपला कळलेही नाही. पण पुढे ट्रॅफिक जाम लागले. दुपारचं ऊन चढलं होतं. भर उन्हात गाड्या बऱ्याच वेळ जागेवरच उभ्या होत्या. एव्हढ्या उन्हातही शैलेश (माझे यजमान) खाली उतरून ट्रॅफिक किती जाम झालेय त्याचा व्हिडिओ काढत होते. आणि हसत होते. हा माणूस एक अजब रसायन आहे. याला कशाचाही त्रास होत नाही. कोणत्याही परिस्थितीत एन्जॉय करणारा. मला एव्हाना गाडी आणि उन्हाचा त्रास व्हायला लागला होता.

शेवटी अर्ध्या तासाने गाड्या हळूहळू पुढे सरकू लागल्या. काही




अंतर पुढे गेल्यावर रस्ता मोकळा झाला. मी एकदाचे हुश्श केले.

जेवणाची वेळ झाली होती. आम्ही कोणते छान रेस्टॉरंट दिसतेय का पहात होतो.

थोड्याच वेळात एक सुंदर रेस्टॉरंट दिसले. तिथे आम्ही थांबलो. मोठ्या कमानी केलेल्या भिंती, भव्य प्रवेशद्वार, प्रवेशद्वाराजवळ एक दगडी तुळशीवृंदावन होतं. त्यावर सुंदर नक्षीकाम केलं होतं. फुलांची सजावट केली होती. आणि त्यावर हिरवीगार तुळस. ते पाहूनच मन प्रसन्न झालं. प्रवेशद्वार एखाद्या भव्य राजवाड्याचे असते तसं होतं. आतही छतावर सुंदर नक्षीकाम केलेलं होतं. ठिकठिकाणी पितळेच्या मोठ्या वस्तू व फुलांची सजावट केली होती. एकंदरीत ते एखाद्या राजवाड्या सारखंच वाटलं. बाजूलाच एक साईबाबांचं मंदिर होतं. जेवणही छान होतं. आम्ही सगळ्यांनी जेवणावर ताव मारला व पुढील प्रवासाला निघालो.

अलिबाग जवळ आल्यावरही ट्रॅफिक लागलं. त्यामुळे पोहोचायला उशीर झाला. संध्याकाळ झाली होती. वर्सोली बीच जवळ आमचे रिसॉर्ट होते. रिसॉर्ट वर चेक इन केले. उशीर झाल्यामुळे आता बीच वर जायचे की नाही हा विचार करत होतो. शेवटी पटकन आवरून थोडा वेळ तरी जाऊन येऊ आणि परत उद्या सकाळीही जाऊ असं ठरलं. पटकन आवरून आम्ही बीच वर निघालो.

सुर्यास्ताच्या आधी आम्ही बीच वर पोहोचलो. मस्त गार वारा सुटला होता. पायांना मऊ मऊ वाळूचा स्पर्श सुखावत होता. सगळीकडे लगबग सुरू होती. लहानमोठी सगळी मंडळी लाटांसोबत खेळत होती. काहीजण निवांत किनाऱ्यावर बसले होते. आकाशात सूर्य मावळतीकडे झुकला होता. तेवढ्यात एक मुलगा सजवलेली सायकल घेऊन आला. आम्ही ती मस्त सायकल समुद्रकिनारी चालवण्याचा आनंद घेतला. थोड्या वेळाने एक बाइक पण चालवली. खूपच मस्त वाटलं.

लाटांमध्ये चालत फिरणे तर खूपच आल्हाददायक होते. हळूहळू सूर्य मावळू लागला. आम्ही लाटांमध्ये उभे राहून तो नयनरम्य सूर्यास्त अनुभवला.


मनात आणि फोटोत ते क्षण साठवून आणि परत सकाळी लवकर उठून बीच वर यायचं असं ठरवून आम्ही निघालो. एके ठिकाणी मस्त जेवण करून थोडी भटकंती केली. तिथल्या एका फेमस पान शॉप मध्ये वेगवेगळ्या फ्लेवरचे पान होते. चॉकलेट, आंबा, काजू, पिस्ता..अजून बरेच. पानामध्ये २० ते २५ वेगवेगळे प्रकार पाहून मला आश्चर्य वाटलं. सगळ्यांनी आपआपल्या आवडीचे पान घेतले. पान इतके छान होते की, एकावर मन कुठे भरणार, मग सगळ्यांनी दोन/तीन पान घेतले.

नंतर आम्ही रिसॉर्ट वर परतलो.

अधुन मधुन मुलांशी फोन चालू होते. आम्हाला वाटत होते. त्यांची काही गैरसोय होतेय का, पण उलट ते मस्त एन्जॉय करत होते. आणि घरात एकटे असल्याने जबाबदारीने अनेक गोष्टी करत होती. त्यांच्यासाठीही हा एक वेगळा अनुभव होता.

(क्रमशः)




## जात्यावरच्या ओव्या......

बोल बोला खरे
नका वागू बोलू खोट
वाणी होईल सत्याची
खर्याच मोल मोठ ||५७८||

बोल बोलली मंथरा
झाले राम वनवासी
तुझी माझी काय कथा?
बोला पायी पाप राशी ||५७९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग १५




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

मना पाहता सत्य हे मृत्यूभूमी ।
जिता बोलती सर्वही जीव मी मी
चिरंजीव हे सर्वही मानिताती ।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती १५ ।


अर्थ :आपल्या भोवताली दिसणारे सुंदर जग म्हणजे मृत्यूभूमी आहे ही सत्य गोष्ट आहे. असे असले तरी माणूस जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत अहंकारामुळे मी मी करीत असतो. आपण अमर आहोत अशीच सर्वांची भावना असते. परंतु एक दिवस अचानक हे सगळेच सोडून जावे लागते.




विवेचन : आधीच्या श्लोकात समर्थ आपल्याला महाथोर ते मृत्यूपंथेची गेले असे सांगतात. या श्लोकात आपण ज्या पृथ्वीवर म्हणजेच इहलोकांत राहतो तो इहलोक किंवा ही पृथ्वी मृत्यूभूमी कशी आहे हे समजावून सांगतात. हे जग नित्य बदलते आहे किंबहुना बदल हाच या जगाचा स्थायिभाव आहे. उत्पत्ती, स्थिती आणि लय या तीनही अवस्था पृथ्वीवर आपल्याला बघायला मिळतात. भासमान असणाऱ्या या दृश्य जगात प्रत्येक गोष्ट आपल्याला उत्पत्ती, स्थिती आणि लय या अवस्थातून जाताना दिसते. माणसाला देखील याच अवस्थांमधून जावे लागते. तरीसुद्धा प्रत्येक माणूस स्वतःला चिरंजीव समजतो आणि आपण केलेल्याचा अहंकार मिरवत असतो. हा अहंकार भल्याभल्यांचा घात करतो. ज्यांना साधना मार्गावर चालायचे आहे, त्यांना तर अहंकार विषाप्रमाणे वर्ज्य आहे. संत, सद्गुरू किंवा सद्ग्रंथ यांच्यामध्ये अहंकार दूर करण्याचे सामर्थ्य असते. म्हणून साधकाने त्यांचा आश्रय घ्यावा.

माणूस आयुष्यभर सुखाच्या मागे लागून पैसा कमावतो. घरदार, मुलेबाळे सगळे नाती निर्माण होतात. परंतु या सगळ्या गोष्टी इथेच राहतात. माणूस गेला की पैसा, धन, संपत्ती जागच्या जागीच राहते आणि इतरांची मालमत्ता होते. पत्नी त्याला दारापर्यंत पोहोचविण्यास येते, समाजातील लोक त्याला स्मशानापर्यंत पोहोचवतात. मात्र अगदी अंगावरचा कपडा देखील सोबत येत नाही. सोबत जाते ते फक्त आपले कर्म. परंतु तरीही माणसाचा ताठा किंवा गुर्मी शेवटपर्यंत कायम असते. मी एवढा पैसा कमावला, मी एवढे वैभव मिळवले, मला एवढे यश मिळाले, हे सगळे माझ्या कर्तृत्वामुळे ! माझी मुले, माझी बायको असे सगळे तो मी मी करत असतो.

**(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## देहान्त निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या मनातील विवेकाचा आधार घेऊन संत व परमार्थ समजून घ्यावा.

असा विवेक सातत्याने चालू ठेवला म्हणजे

विषय विवेचना मध्ये नवीन विचार सुचतात.

नेहमी शुध्द अद्वैताचे विवेचन प्रतिपादन करावे. म्हणजे संतांच्या संगतीत राहून समाधानाचा अनुभव येतो.


तो सर्व त्याग समाजाच्या विविध स्तरातील घटकांना व त्यांच्या जवळील असलेल्या अनिष्ट प्रथा चुकीच्या मार्गाने गेलो तर होणारे नुकसान समजून सांगतो.

साधकाने संतांना शरण जावे. मग ते स्वतः संतपदास पोहचतात. दयावृत्तिचे सतत पालन करावे. संतांच्या संगतीत राहून आत्मज्ञान आत्मसाक्षात्कार होतो. मनुष्य जन्मातील देहाचे सार्थक करण्यासाठी सतत संतवचनाचा विचार मनात घोळवावा. संतसंगतीसारखे दुसरे साधन नाही. सद्गुरूंच्या भक्तिचा आदर करावा व आधार घेऊन सदैव आत्मानात्म विचार करावा.आचरण नेहमी शुध्द ठेवावे.

संतवाक्याचा आधार संतवचनावर चालणे.

संत विचारांचा नेहमी आदर करणे या त्रिस्तरीय किंवा त्रिसूत्रीचा विचार करून जो साधक जीवन जगतो तो ब्रम्हपदाला पोहचलेला असतो. सद्गुरूंच्या संगतीत समाधानाचा लाभ होतो. सद्गुरूंच्या भक्ति मध्ये परमार्थ जन्म पावतो. आपण जन्म घेतला एवढंच खरं पण आपल्याला हे नश्वर जग एक दिवस सोडून जायचे आहे हा देह खरा नाही हे मनापासून ओळखावे. व मिळालेल्या नरजन्माचे सार्थक करून घ्यावे. अत्यंत पवित्र अंतःकरणाने सद्गुरूचे मन जिंकून घ्यावे व नरजन्माचे सार्थक करावे. तेव्हा दयावंतहोऊन आपली भाग्यरेखा उजळविणे आपल्याच हातात आहे. **(क्रमशः)**

## नामाचा अनुभव



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

**भागवत कथाकार : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर**

कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे....

■ चवथा स्कंद

भागवत कृत सृष्टी याला सर्ग म्हणतात.

विसर्ग म्हणजे भगवंत निर्मित व्यक्ती, देवतेद्वारे सृष्टी निर्मिती याला विसर्ग म्हणतात.

आपले 2bhk ही आपली सृष्टी आहे. परमात्म्याने सृष्टी निर्माण करताना एक स्त्री निर्माण झाली. आपण त्या स्त्रीच्या संबंधाने जे नाती निर्माण झाले ती जीवकृत सृष्टी झाली. स्त्री ही इशकृत प्रपंच आहे. भगवंताने निर्मित प्रपंच इ कोणाच्याही दुःखाला कारण होत नाही. परमात्म्याने झाडे, नदी, पर्वत निर्माण केला. याचा उपयोग घेताना आम्ही त्याचा अतिरेकाने गैरवापर केला म्हणून संकट येते. आज काल वापरा व फेकून द्या ही वृत्ती झालीय. माझ्याकडे एक घड्याळ आहे. समजा ते चोरी गेले. तर मला वाईट वाटेल. या चोरीचे दिवशी त्याच गावातील घडाळ्याचे दुकान फोडून 500 घड्याळी चोरी गेल्या. पण ती 500 घडाळे चोरी गेल्याचे दुःख मला नाही कारण ती माझी नव्हती.

कोणताही जड पदार्थ आपल्या दुःखाचे कारण नसतोच. दुःख या मुळे होते की, त्या घटनेला माझेपण आपण लावल्याने दुःख होते. ते ममत्व आपल्या दुःखाला कारणी भूत असते.

इशकृत प्रपंच सर्ग असतो.

विसर्ग प्रपंचात माणूस त्या विषयी ममत्व जोडल्याने झालेल्या दुःखातून परमेश्वराचा विचार करतो. संसाराच्या ताप तप्त झालो.

तुकोबाराय यांचा परमार्थ हा ज्ञानाचा आहे.

आपल्या साऱ्यांचा परमार्थ हा दुःखातून जन्मलेला आहे.दुःखाचे निमित्त होऊन का होईना परमेश्वर आठवावा.परमेश्वराचे कर्तृत्व पाहून आपण त्याच्याकडे पहावे पण तसे होत नाही.

आपल्या मागण्या आपली वैयक्तिक दुःख निवारण्याचीच अपेक्षा ठेवतात.

सर्ग आणि विसर्ग याचा विचार यासाठी आलाय.दुःखकृत किंवा ईश कृत प्रपंचात का होईना आपण परम्यात्मा कडे वळावे.

आपला कोणताही विचार अंतरंगात ईशभक्ती साठी असावा. क्रमशः.....

## आरोग्य संजीवनी



## हृदयाची काळजी घ्या, कोलेस्टेरॉल कमी करा

ज्योतिर्मय साहित्य

अनेक प्रकारचे आजार आहेत जे झाले तरी लवकर लक्षात येत नाहीत. काही वेळा विशेष त्रास न होता हे आजार बरे होतात. आजार कोणताही असू दे शरीराची हानी ही करतोच. हृदयाचेही तसेच आहे. हृदयावर ताण आल्यास त्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. हा परिणाम लगेच दिसून येत नाही पण तो परिणाम जास्त त्रासदायक ठरू नये यासाठी हृदयाची व्यवस्थित काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी किरकोळ स्वरुपाचा त्रास झाला तरी वैद्यकीय तपासणी करुन घेणे डॉक्टरांच्या सल्ल्याने आवश्यक उपचार करुन घेणे हिताचे आहे.

जग वेगाने प्रगती करत आहे, या प्रगतीसोबतच नवनव्या आजारांचा जन्म होत आहे. काही जुने आजार तीव्र स्वरुपात माणसाला त्रास देऊ लागले आहेत. यातच समावेश होतो कोलेस्टेरॉल या आजाराचा. हा आजार अतिशय आरामात शरीरात प्रवेश करतो. एरवी फिट दिसणारे तरुण तरुणीही या आजाराला बळी पडू शकतात. नियमित वैद्यकीय तपासणी करणाऱ्यांना या आजाराचे संकेत लवकर मिळू शकतात. पण इतरांना हा आजार झाल्याचे कळायला वेळ लागतो.

कोलेस्टेरॉलचा आजार जेवढा गंभीर आहे तेवढाच तो दूर करणेही सोपे आहे. पण त्यासाठी चिकाटी हवी, संयम हवा आणि सातत्य हवे. काही सोपे उपाय नियमित केले तर कोलेस्टेरॉलच्या आजारावर मात करणे शक्य आहे.

कोलेस्टेरॉल म्हणजे काय?

सोप्या भाषेत सांगायचे तर कोलेस्टेरॉल हा रक्तात असलेला घटक आहे. शरीरात रक्ताभिसरण सुरळीत सुरू राहावे वेगवेगळ्या अवयवांना ऊर्जा मिळावी यासाठी रक्तातील कोलेस्टेरॉलचा वापर होतो. नैसर्गिकरित्या शरीर कोलेस्टेरॉल तयार करते तसेच फास्ट फ ूड, जंक फूड, भरपूर तेलाचा वापर करुन केलेले पदार्थ यांच्या सेवनामुळे शरीरात कृत्रिम कोलेस्टेरॉल प्रवेश करते. शरीरात कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढले की ते रक्तवाहिन्यांजवळ चिकटून नव्या भिंती,

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

नवे अडथळे निर्माण करते. यामुळे शरारीत सतत सुरू असलेल्या रक्ताभिसरण प्रक्रियेवर परिणाम होतो. रक्ताभिसरणावर परिणाम झाल्यास तब्येत बिघडण्यास सुरुवात होते. शरीरात अतिरिक्त कोलेस्टेरॉलची निर्मिती होणे या आजाराला हायपर कोलेस्ट्रोलेमिया म्हणतात. शरीरात दोन प्रकारचे कोलेस्टेरॉल आढळते. कमी घनता असलेले लिपोप्रोटीन आणि जास्त घनतेचे लिपोप्रोटीन कोलेस्टेरॉल शरीरात आढळते. कोलेस्टेरॉलचे शरीरातील प्रमाण वाढण्याची अनेक कारणं आहेत. यातील २ प्रमुख कारणं

आहाराच्या तुलनेत शरीराच्या हालचाली कमी असणे फास्ट फूड, जंक फूड, भरपूर तेलाचा वापर करुन केलेले पदार्थ यांचे मोठ्या प्रमाणावर सेवन

जर वजन जास्त असेल तर दोन पैकी किमान एक आणि काही वेळा दोन्ही कारणांमुळे शरीरात कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असते. रक्ताची कोलेस्टेरॉल तपासणी करुन घ्या. यात शरीरातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण समजेल. रक्तात २०० / कोलेस्टेरॉल असेल तर चिंतेची गरज नाही. पण रक्तात २००-२३९ / कोलेस्टेरॉल असेल तर कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढायला सुरुवात झाली आहे हे लक्षात घ्या. जर रक्तात २४० / कोलेस्टेरॉल असेल तर कोलेस्टेरॉलचे प्रमाण चिंताजनक आहे. कारण हे हाय कोलेस्टेरॉल आहे. ज्यांच्या शरीरात कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असते अशांना हृदयविकाराचा सर्वाधिक धोका असतो. **(क्रमशः)**

## आनंदामृत ....

**विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...**

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





### ♦वेताळ कथा २२ (वेताळ पंचविंशती)

एका राजाला दोन प्रकारचे अनुभव येत होते. कधी अत्यंत आनंद, कधी अत्यंत दुःख. तो या बदलांमुळे अस्थिर झाला. एक ज्ञानी ऋषी त्याला म्हणाले – "तू अनुभवांमध्ये हरवतो आहेस."

राजाने विचारले – "मग काय करावे?"
ऋषी म्हणाले – "अनुभवांना पाहा, पण त्यात अडकू नकोस."
राजाने हे आचरणात आणले. हळूहळू त्याचे मन स्थिर झाले. आनंद आला तरी तो शांत राहू लागला, दुःख आले तरी तो विचलित झाला नाही. वेताळाने विचारले – राजा शांत कशामुळे झाला?
राजा विक्रम म्हणाला – "जेव्हा त्याने भावनांशी एकरूप होणे सोडून त्यांना पाहायला सुरुवात केली, तेव्हा तो शांत झाला."
राजाचे उत्तर मिळाले, वेताळ खूष झाला पण आधी ठरल्याप्रमाणे उत्तर मिळाल्यामुळे तो पुन्हा झाडावर जाऊन लटकला.
यावर प्रश्न विचारायचा स्वतःला की मी भावनांमध्ये हरवते का? त्यांना साक्षीभावाने पाहू शकते?
मनाचा बावीसावा स्तर (गूढ संबंध)
या कथेत "तटस्थता आणि भावनिक संतुलन" दिसते.
१: भावना : आनंद, दुःख, राग. २: गुंतवणूक : भावनांशी एकरूप होणे. ३: असंतुलन : मन हेलकावे खात राहते. ४: निरीक्षण : भावना पाहण्याची क्षमता. ५: तटस्थता : संतुलित राहणे
थोडक्यात: घटनेवर आत्मचिंतन केल्यास काही चुकीचे व घाईघाईने निर्णय घेण्यापासून आपण वाचू शकतो
"भावना येतात-जातात, साक्षी स्थिर राहतो."
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# एक चिरंतन चित्रपट: मुग़ल-ए-आज़म

**ज्योतिर्मय साहित्य**

डॉ. मीना श्रीवास्तव हे नाव माझ्या माहितीनुसार बहुतेक मराठी वाचकांना परिचित आहे. त्यांची लेखनशैली आवडणारे अनेक वाचक आहेत. माझ्या आजपर्यंत प्रकाशित झालेल्या सर्व पुस्तकांवर त्यांनी अत्यंत ओघवत्या आणि लालित्यपूर्ण भाषेत परीक्षणे लिहिली आहेत. त्याचप्रमाणे माझ्या लेखनावर त्यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रतिक्रिया वाचक वर्गाची दाद घेऊन गेल्या आहेत. माझ्या रामायण महत्व आणि व्यक्तीविशेष आणि महर्षी वाल्मिकी या दोन्ही पुस्तकांचे त्यांनी हिंदी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये केलेले अनुवाद रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत. तसेच प्रा. हेमंत सामंत यांच्या अनामिक क्रांतिकारकांच्या आंदोलनाविषयी मराठी लेखांवर आधारित त्यांची दोन हिंदी अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे लेखन वाचताना वैद्यकीय व्यवसायात असलेली ही व्यक्ती इतके सुंदर मराठी लेखन करू शकते याचेही आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.





'मुग़ल-ए-आज़म' म्हणजे काळाच्या पडद्यावर अमिट ठसा उमटवून गेलेली अजरामर कलाकृती. हा चित्रपट १९६० मध्ये प्रदर्शित झालेला असला तरी त्यातील कथा आजही ताजी आणि टवटवीत वाटते. ही प्रेम कथा म्हणजे कलेच्या प्रांतातील सगळ्याच कलाकारांनी पाहिलेले एक भव्य दिव्य स्वप्न असे म्हणता येईल. या पुस्तकात डॉ. मीना श्रीवास्तव यांनी या स्वप्नाचा प्रवास, त्यामागील निर्मिती प्रक्रिया आणि तो तयार होत असताना करावा लागणारा संघर्ष अतिशय सुंदर रीतीने उलगडला आहे.

खरे म्हणजे एखाद्या चित्रपटावर एखादे सुंदर पुस्तक लिहिले जाऊ शकते ही कल्पनाच मुळात आपल्याला सुखद धक्का देणारी आहे. तेही १९६० मध्ये निर्माण झालेल्या चित्रपटाबद्दल लिहिणे ही सोपी गोष्ट नाही. त्या काळात जाऊन, त्या सगळ्या गोष्टींचे संदर्भ शोधून त्यांचे हे पुस्तक सिद्ध झाले आहे. त्यांचे हे पुस्तक वाचत असताना आपण थेट त्या काळात जाऊन पोहोचतो. हे भव्यदिव्य स्वप्न साकार करीत असताना निर्माते आणि कलाकार यांच्या मनातील दडलेल्या संवेदना, त्यांनी केलेला त्याग आणि के. आसिफ यांच्यासारखे दूरदृष्टी असलेले दिग्दर्शक यांच्या जिवापाड केलेल्या प्रयत्नांची माहिती त्या या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवण्यात यशस्वी झाल्या आहेत.

हे पुस्तक पाहताक्षणीच आपले मन आकर्षून घेते. मधुबाला म्हणजे मूर्तिमंत सौंदर्य ! मुखपृष्ठावरील आपल्या हाताने आपल्या चेहऱ्यावरील घुंघट बाजूला करणाऱ्या मधुबालाची आकर्षक छबी आपले मन मोहून घेते. तिचा हसतमुख चेहरा, बोलके डोळे हे चित्र जिवंत करतात. या पुस्तकात या चित्रपटाबद्दल सगळं काही सांगणारी माहितीपूर्ण अशी १५ प्रकरणे आहेत. पुस्तकाच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची यादी लेखिकेने दिली आहे. त्यातून लेखिकेची पारदर्शकता, प्रामाणिकपणा तर दिसतोच परंतु पुस्तकातील माहितीची अधिकृतता सुद्धा प्रमाणित होते. पुस्तकामध्ये ठिकठिकाणी या चित्रपटाशी संबंधित कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आदींची कृष्णधवल छायाचित्रे दिली आहेत. त्यामुळे पुस्तक अधिक बोलके होते.

या पुस्तकाच्या लेखनासाठी लेखिकेने अपार कष्ट घेतले आहेत. मुगले आजम या चित्रपटाने लेखिकेच्या मनावर आधीपासूनच गारुड केले होते. परंतु हे पुस्तक लिहायचे ठरल्यानंतर संदर्भ ग्रंथ मिळवणे, आंतरजालावरील माहिती मिळवणे या सगळ्या गोष्टीत त्या कमालीच्या गढून गेल्या आणि



विश्वास देशपांडे
चाळीसगाव

जवळपास दोन वर्षे त्या मुगले आजमच्या जगातच मनाने वावरत होत्या याची साक्ष त्यांचे मनोगत वाचल्यानंतर मिळते.

शहजादा सलीम आणि दासी अनारकली तरुण वयामध्ये भेटतात. त्यांना एकमेकांबद्दल आकर्षण निर्माण होते पण हे दोन प्रेमी जीव एकत्र येऊ शकत नाहीत. शहजाद्याचे वडील त्यांच्या प्रेमात भिंत बनून उभे राहतात आणि दोघांचे मार्ग वेगळे होतात. अशी ही खरंतर साधी सोपी कथा. परंतु या कथेमध्ये दिग्दर्शक के. आसिफ यांनी इतके सुंदर रंग भरले की ही कथा पडद्यावर जिवंत झाली आणि युगानुयुगे लोकांना ती आठवत राहील अशा प्रकारे तिचे सादरीकरण त्याने आणि इतर कलाकारांनी केले.

या चित्रपटाचे संगीत आणि गाणी हा सुद्धा एक वेगळ्याच संशोधनाचा आणि लेखनाचा विषय व्हावा इतके ते उच्च दर्जाचे आहे. ती गाणी आजही ताजी टवटवीत वाटतात. या सगळ्या गोष्टींचा मनोरम धांडोळा खास स्वतंत्र प्रकरणातून लेखिकेने घेतला आहे. चित्रपटाचे संगीतकार नौशाद अली यांच्याबद्दलची आणि गीतकार शकील बदायुनी यांच्याबद्दलची अतिशय सुंदर माहिती लेखिकेने दिली आहे. लिहिण्याची शैली तर एवढी ओघवती आहे की वाचक उत्सुकतेने पुढे पुढे वाचत जातो.

आधी श्वेतधवल असलेला हा चित्रपट आधुनिक तंत्रज्ञानाच्या किमयेने नंतर नवरंगात न्हाऊन आला. त्याचप्रमाणे त्याचे रंगमंचीय सादरीकरण देखील झाले. त्या चित्रपटाची ही सगळी रूपे लेखिकेला अपार भावली. या चित्रपटाचे दिग्दर्शक असलेल्या के. आसिफ यांच्या जीवन चरित्रावर लेखिकेने टाकलेला प्रकाशझोत आणि चित्रपटाला आर्थिक सहाय्य करणारे शापूरजी पालोनजी यांच्या बद्दलची माहिती आपल्याला चित्रपट कसा तयार झाला हे समजून घेण्यासाठी अतिशय महत्त्वाची मदत करते.

त्याचप्रमाणे या चित्रपटात काम करून आपल्या अभिनयासाठी अमर झालेले पृथ्वीराज कपूर, दिलीप कुमार, मधुबाला, दुर्गा खोटे, निगार सुलताना, इत्यादी कलाकारांबद्दल आणि त्यांच्या जीवनाबद्दल लेखिकेने फार रोचक शब्दात माहिती दिली आहे. त्यांचे जीवनातील फारसे कोणाला माहीत नसलेले हृद्य प्रसंग सांगितले आहेत.

या चित्रपटातील संवादांचे सौंदर्य लेखिकेने चित्रपटातील प्रत्यक्ष संवाद देऊन वाचकांच्या नजरेस आणले आहे. त्यामुळे चित्रपटातील कथा प्रत्यक्ष आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. या चित्रपटाशी संबंधित छोटे-मोठे कलाकार, तंत्रज्ञ, त्यासाठी प्राणपणाने मेहनत करणारी सगळी माणसे या सगळ्यांची माहिती या पुस्तकात आपल्याला मिळते. या चित्रपटाशी संबंधित कुठलीही छोटीशी माहिती देखील दुर्लक्षित होणार नाही याची काळजी हे पुस्तक लिहिताना लेखिकेने घेतलेली दिसते. त्यामुळेच चित्रपट रसिकांसाठी हे पुस्तक म्हणजे मस्ट रीड असे आहे.

एकदा हातात घेतल्यानंतर हे पुस्तक सोडवत नाही. लेखन, भाषाशैली, चित्रे, छपाई या सर्व दृष्टीने पुस्तक अत्यंत देखणे झाले आहे. केवळ चित्रपट रसिकांसाठीच नव्हे तर साहित्य आणि कलेचा अभ्यास करणाऱ्या प्रांतातील सर्वांसाठी हे पुस्तक म्हणजे एक अनमोल ठेवा ठरणार आहे.

अशा या सुंदर पुस्तकासाठी मी लेखिका डॉ. मीना श्रीवास्तव आणि प्रकाशकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि हे पुस्तक वाचकांना नक्कीच एक चांगले पुस्तक वाचल्याची अनुभूती देईल अशा शुभेच्छा व्यक्त करून थांबतो.

पुस्तक - एक चिरंतन चित्रपट: मुग़ल-ए-आज़म

पुस्तकाचे प्रकाशक- लोकव्रत प्रकाशन

पुस्तकाची पाने - १५४

पुस्तकाची किंमत - ₹ ३००

पुस्तकाविषयी अधिक माहितीसाठी लेखिका डॉ. मीना श्रीवास्तव यांच्याशी ९९२०१६७२११ या व्हाट्सऍप नंबर वर संपर्क साधावा.





ज्योतिर्मय

गुढीपाडव्यापासून आपण ज्योतिर्मय दैनिकात वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिराती सुरु करीत आहोत, आपल्या घरातील मुलांचे किंवा मुलींचे वाढदिवस शुभेच्छारुपी जाहिराती मधून साजरे करणार आहोत.
शुभेच्छा दिल्याने प्रेम वाढते, आपुलकी वाढते तसेच आनंदी वातावरण निर्माण होते.
सर्वांना ही कल्पना निश्चित आवडेल असे मला वाटते.
त्याकरिता नाममात्र शुल्क असणार आहे.

- 15 वर्षाच्या आत असेल तर फक्त 100 रुपये
- 15 वर्षावरील व्यक्तीस फक्त 300 रुपये.
- जाहिरातीचा मॅटर व पैसे वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर पाठविणे.
- डिझाईन करून पाठविले तरी चालेल, किंवा मॅटर व्हाट्सअप वर पाठविणे, मॅटर लिमिटेड असावा.
- जाहिरातीचे पेमेंट 7743918559 या नंबरवर ऑनलाईन पाठविणे.
- काही शंका असेल तर 7743818559 या नंबरवर फोन करणे.
- पुण्यस्मरणची जाहिरात पण फक्त 100 रु.मध्ये प्रकाशित केली जाईल.

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे




## सकल किष्किंधा की तारक : गुणमण्डित 'तारा'

लेखिका- डॉ. मीना श्रीवास्तव

आगे.........

परन्तु कुछ दिनों में बाली वापस आता है | बाली को शक होता है कि सुग्रीव को राजा बनना था, इसलिए उसने छल से गुफा का द्वार जानबूझकर बंद कर दिया, जब कि वास्तव में ऐसा नहीं था | इस घटना के चलते बलशाली बाली सुग्रीव को किष्किंधा से निकाल बाहर करता है, साथ ही उसकी पत्नी रूमा का अपहरण कर उसे कैद कर लेता है | दोनों भाई एक दूसरे के परम शत्रु बन जाते हैं|

सुग्रीव अपने चुनिंदा साथियों समेत ऋष्यमूक पर्वत पर रहता है | यहाँ बाली मातंग ऋषि के शाप के कारण आ नहीं सकता, इसलिए सुग्रीव सुरक्षित है| परन्तु राम से भेंट होने के बाद उसकी सलाह के अनुसार वह बाली को द्वंद्वयुद्ध के लिए आवाहन करता है | पहले मौके पर दोनों भाइयों के समान दिखने के कारण राम बाली को बाण मारने में असमर्थ होते हैं | तब राम सुग्रीव को गले में माला पहनने के लिए कहते हैं| इसके बाद सुग्रीव तुरंत ही फिरसे बाली को द्वंद्वयुद्ध के लिए ललकारता है| तब तारा संभाव्य संकट को भांप लेती है और बाली से बारम्बार कहती है कि, सुग्रीव की उसके समर्थक एवं त्राता राम के साथ भेंट हुई है| वह हर तरह से बाली को समझने का प्रयत्न करते हुए बताती है, “सुगीव को श्रीराम का संरक्षक कवच प्राप्त हुआ है, इसीलिये उसकी इतनी हिंमत बढ़ गई है और वह यह साहस कर रहा है |

"तारा बाली को युद्धभूमि में जाने से मना करती है और उसे रोकने की भरसक कोशिश करती है | परन्तु अत्यधिक बल के घमंड में चूर उन्मत्त बाली अपनी सुजान पत्नी की सलाह को अनदेखा करता है और उसे ठुकराकर युद्ध लड़ने चला जाता है| परिणाम वहीं होता है जो अपेक्षित है और श्रीराम बाली को वृक्ष की ओट से बाण मारते हैं | वह एक साधारण बाण है | बाली को अपने अपराध का बोध होकर उसे पश्चाताप हो तथा शांतिपूर्वक मृत्यु मिले, इसलिए राम ऐसा करते हैं| अन्यथा वे अपने अमोघ बाण से बाली का तत्काल वध करू सकते थे |

अब बाली की मरणोन्मुख अवस्था जानते ही तारा रणभूमि पर जाती है और स्वाभाविक रूप से सामान्य स्त्री की तरह करुण विलाप करती है| राम ने अपने शक्तिशाली पति को कपटपूर्वक बाण मारा है, यह जानकर वह श्रीराम तथा सुगीव, इन दोनों की कठोर शब्दोंमें निर्भत्सना करती है| कुछ सन्दर्भों के अनुसार तारा राम को पत्नी वियोग का शाप तक दे देती है | बाली को वीरगती प्राप्त होने के पश्चात् अपने पति के निधन से शोकमग्न हुई तारा सती जाने को उद्युक्त होती है | परन्तु श्रीराम दर्शनशास्त्र का आधार लेकर उसे समझाते हैं, “हे देवी! बाली ने अपने भाई के साथ अन्याय किया और उसे निर्वासित किया| यहीं नहीं, उसकी पत्नी रुमा का अपहरण किया और उसे बंदी बनाकर रखा| इसका दंड बाली को मिलना सर्वथा उचित ही था|"

क्रमशः.......

## ओळख साहित्यिकांची



### सौ. जयश्री अर्जुन मुंडे

सौ. जयश्री अर्जुन मुंडे या मराठी साहित्यात सक्रिय लेखिका आहेत. त्यांचा लेखन प्रवास कविता, व्यक्तिरेखा चित्र लेखन आणि पुस्तक परीक्षण या विविध साहित्य प्रकारांमध्ये विस्तृत आहे.

त्यांच्या लेखनाची दखल अनेक दैनिके व माध्यमांनी घेतली आहे. ज्योतिर्मय साहित्य, आधुनिक केसरी आणि मराठवाडा साथी या वृत्तपत्रांमध्ये त्यांच्या कविता, लेख आणि पुस्तक परीक्षण प्रकाशित झाले आहेत. तसेच ग्लोबल भारत या दैनिकात त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. बोल मराठी या संकेतस्थळावरही अनेक कविता प्रकाशित झाल्या आहेत.

त्यांनी मराठवाडा साहित्य परिषद, अंबाजोगाई आयोजित दहाव्या साहित्य संमेलनात "व्यथा गरीबांची" या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे.

त्याचबरोबर कथा लेखन कार्यशाळा, गझल लेखन कार्यशाळा, शिक्षक कवी संमेलन, अंबाजोगाई येथे सहभाग नोंदवला आहे.

अकराव्या साहित्य संमेलनात "निमंत्रित कवी" म्हणून काव्य सादरीकरण केले आहे.

त्यानंतर मार्गदर्शक पुस्तक समीक्षा मध्ये त्यांनी “भारत पर्व” आणि “जागरण” या आत्मचरित्राचे समीक्षा प्रकाशन केले आहे. तसेच गौ राई स्मरणिकेत - अमृतवेल पुस्तक परिचय, "द हिडन लाईफ ऑफ टीस" या पुस्तकांचे पुस्तक परीक्षण, विविध सह शालेय उपक्रमांमध्येही योगदान समाविष्ट आहे.

"तुझी साद ओली" बाबाराव मुसळे लिखित काव्यसंग्रह रस ग्रहण केलेले आहे.

सौ. मुंडे यांनी विविध साहित्य उपक्रमांमध्ये नियमित सहभाग घेतला आहे, मराठवाडा साहित्य परिषद आयोजित मासिक मैफल व पुस्तक परिचय उपक्रम, DIET अंबाजोगाई व मैत्री प्रतिष्ठान आयोजित शिक्षक वाचन समृद्धी उपक्रम, अक्षर आनंद वाचन उपक्रम, इंनरव्हील क्लब,अंबाजोगाई

त्यांच्या कवितांचा समावेश वारसा साहित्य मंच, काव्यगंध, वारसा साहित्य मंच आयोजित प्रतिनिधिक काव्यसंग्रहात अभंग आहे. त्यांच्या साहित्य कार्याची दखल घेऊन इंनरव्हील क्लब अंबाजोगाई “राष्ट्राचे शिल्पकार पुरस्कार” प्रदान करण्यात आले आहे.

सौ. जयश्री मुंडे या सतत साहित्य क्षेत्रात सक्रिय राहून समाजभान जपणाऱ्या, विचारप्रवर्तक आणि हृदयस्पर्शी लेखन करणाऱ्या लेखिका आहेत. त्यांच्या लेखनातून सामाजिक जाणीवा, मानवी भावना आणि संस्कृतीचा सुंदर संगम दिसून येतो.

♦ प्रेरणा स्थाने

आई,वडील, बाबाराव मुसळे, बाबा चन्ने, संजय व्यापारी सर, स्व.सोपान हाळमकर, स्व. सतीश बियाणी, आबासाहेब वाघमारे गुरुजी, दगडू लोमटे दादा, अमर हबीब काका, गोरख शेन्द्रे, सुदर्शन रापतवार, राजेंद्र रापतवार, नागनाथ बडे, शैलजा बरुरे, युवराज माने, विलास काळे, विनोद शेंडगे, राधा मान्टे, सुजाता भोजने

■ ■




### ♦ पुस्तके व वर्तमानपत्र वाचन

वाचनाचे फायदे, वाचाल तर वाचाल, हे आपणाला नेहमी कुणी ना कुणी सांगतोच, पण प्रत्यक्षात कोण व किती आमलात आणतात, हे संशोधनासारखे होईल. वाचन गरजेचे आहे, समाज व देशाप्रति जागरूक राहण्यास वर्तमानपत्र वाचणे हे प्राथमिक कर्तव्य आहे.
वाचनाची सवय हाच सुजान
नागरिकत्वाचा खरा आधार आहे. वाचन आपल्याला खरा विश्वास व शहानिशा करायला
शिकविते. पण आता दूरदर्शन मुळे सर्व मिळते. म्हणून वाचन कमी झाले. खरे तर अगदी शालेय जीवनापासूनआई, वडिल शिक्षक वाचन करायला सांगतात, पण लक्षात कोण घेतो, असो पण आपल्या शरीरासाठी जसे अन्न व व्यायाम गरजेचा महत्वाचा तसाच बुद्धीला वाचन पाहिजे. म्हणून ऊत्तर प्रदेश सरकारनं सरकारी मा.शाळेत विद्यार्थी वर्गाला पेपर, सकाळी बातम्याही वाचन लेख, क्रिडा जगत वाचणे अनिर्वाय केले!! त्यामुळे त्या मुलाचं स्क्रीन टाईम टाळून ते एकाग्र होतील.ही सवय त्यांना ध्येय गाठण्यासाठी मदत करेल. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरापासून बिल गेट्स
पर्यंत आपल्या यशाचे श्रेय ते वर्तमानापत्र वाचण्याला देतात.. तर विचार करा, वाचन करा. स्वस्थ राहा, मस्त राहा..
शुभ दिवस आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना..


## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# ना. घ. देशपांडे-श्रेष्ठ भावकवी

**ज्योतिर्मय साहित्य**

नागोराव घनश्याम देशपांडे (१९०९ - २०००), ना. घ. देशपांडे किंवा नाघ या नावाने प्रसिद्ध आहेत, आधुनिक मराठी साहित्यातील एक श्रेष्ठ भावकवी म्हणून परिचित आहेत. निसर्ग आणि प्रेम या विषयांवर त्यांनी अत्यंत तरल आणि कोमल शब्दांत कविता लिहिल्या आहेत.

त्यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील शेंदुर्जन या गावी २१ ऑगस्ट १९०९ रोजी नागपंचमीच्या दिवशी झाला, म्हणून त्यांचे नाव नागोराव ठेवण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेडा हे त्यांचे मूळ गाव होते.

त्यांचे शिक्षण मेहकर, खामगाव आणि नागपूर येथे झाले. बी.ए., एल.एल.बी. केल्यानंतर त्यांनी मेहकर येथे वकिली व्यवसाय केला.

ना. घ. देशपांडे यांच्या कवितांमध्ये निसर्गाची विविध रूपे आणि मानवी मनातील हळवे प्रेम यांचा सुंदर मिलाफ आहे. शीळ, अभिसार, खूणगाठी, कंचनीचा महाल हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह आहेत.

''तुला न कळले-मला न कळले तरी...'' ''उघड उघड पाकळी'', ''नदीकिनारी, नदीकिनारी, नदीकिनारी गं !

''रानावनात गेली बाई शीळ'', ''डाव मांडून भांडून मोडू नको.... हे त्यांचे गीत सुधीर फडके यांनी गायले असून राम फाटक यांनी संगीतबद्ध केलेले आहे ते खूपच लोकप्रिय झाले.

त्यांच्या कवितांची भाषा साधी पण आशयघन आहे. कमी शब्दांत जास्त भाव व्यक्त करणे हे त्यांच्या लेखनाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. त्यांना त्यांच्या साहित्यासाठी साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

विदर्भातील साहित्याच्या क्षेत्रात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते.

त्यांचे खालील प्रमाणे काव्यसंग्रह आहेत..

अभिसार (इ.स. १९६३)
कंचनीचा महाल, मौज प्रकाशन गृह (इ.स. १९९६) खूणगाठी, मौज प्रकाशन गृह (इ.स. १९८५)
गुंफण, मौज प्रकाशन गृह (इ.स. १९९६)

शीळ, मौज प्रकाशन गृह (इ.स. १९५४) सुगंध उरले, सुगंध उरले (ना. घ. देशपांडे यांची निवडक कविता. संपादक - अरुणा ढेरे)

ना.घ. देशपांडे यांच्या साहित्यातील शीळ आणि खूणगाठी हे अत्यंत महत्त्वाचे आणि लोकप्रिय कवितासंग्रह आहेत.

१. शीळ (१९५४) हा त्यांचा पहिला प्रकाशित कवितासंग्रह असून तो आधुनिक मराठी भावकवितेत मैलाचा दगड मानला जातो.

या संग्रहातील कवितांमध्ये निसर्ग आणि मानवी भावनांची उत्कट गुंफण आहे . अनेक कवितांमध्ये स्वतःच्या व्यक्तिगत जीवनातील अनुभवांचे प्रतिबिंब दिसते.

प्रसिध्द समीक्षक मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांनी या संग्रहाला २३ पानांची प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली आहे, ज्यात त्यांनी देशपांडेंच्या कवितेचे वेगळेपण अधोरेखित केले आहे.

''रानावनात गेली बाई शीळ'', ''नको येऊ तू (१९४९)'', आणि ''किती उशीर हा (१९४०)'' यांसारख्या कविता याच संग्रहातील आहेत.

२. खूणगाठी (१९८५) हा संग्रह ना. घ. देशपांडे यांच्या प्रगल्भ काव्यलेखनाचे प्रतीक मानला जातो.

या कवितासंग्रहासाठी त्यांना १९८६ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या संग्रहातील कविता छंदोबद्धतेकडून मुक्तछंदाकडे वळलेल्या दिसतात अधिक परिपक्व आणि आशयघन कवितांचा हा ठेवा आहे.

''अजून माझ्या तळहातावर'' ही या संग्रहातील एक गाजलेली कविता आहे.

या दोन्ही संग्रहांच्या माध्यमातून देशपांडेंनी मराठी काव्यसृष्टीला निसर्गप्रेम आणि हळव्या भावभावनांची एक नवी ओळख करून दिली.




ना. घ. देशपांडे यांच्या अभिसार आणि कंचनीचा महाल या दोन्ही साहित्यकृती मराठी काव्यविश्वात महत्त्वाच्या मानल्या जातात.

३. अभिसार (१९६४) हा देशपांडेंचा दुसरा महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. या संग्रहासाठी त्यांना महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले होते. यात नायक-नायिकेच्या मिलनाची ओढ, मुक्त प्रेमजीवन आणि मानवी भावनांचे सूक्ष्म पदर उलगडले आहेत. निसर्गातील बदलांसोबत मानवी मनातील भाव कसे बदलतात, याचे सुंदर चित्रण यात आढळते.

श्रावण ही कविता या संग्रहातील एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

४. कंचनीचा महाल (१९९६) हा कवितासंग्रह आणि त्यातील मुख्य दीर्घकविता त्यांच्या मेहकर येथील वास्तव्याशी आणि स्थानिक आख्यायिकांशी संबंधित आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथील कंचनीचा महाल या भग्न वास्तूवर ही कविता आधारलेली आहे. एकेकाळी लावण्यवती असलेल्या कंचनीची आणि तिच्या महालाची आजची दुरवस्था या कवितेतून कवीने मांडली आहे. संग्रहात कंचनीचा महाल सोबतच गिरीजेचा संसार, निश्वास गीतावली आणि जुईची कळी यांसारख्या प्रसिद्ध दीर्घकवितांचा समावेश आहे.

''दोनच उरले मजले खालचे,
कोणीच नाही रे गडी,
एकही कवाड नाही रे, आणखी
एकही नाही रे कडी!''

या ओळींमधून त्या वास्तूची आणि विस्मृतीत गेलेल्या वैभवाची व्यथा प्रभावीपणे व्यक्त होते.

या कविता मधून ना घ देशपांडेंची प्रायोगिक शैली आणि शब्दांमधील नादमाधुर्य प्रकर्षाने जाणवते.

साहित्य क्षेत्राखेरीज इतरही क्षेत्रात त्यांनी कार्य केले. मेहकर येथील मेहकर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य होते. इ.स. १९३५ साली स्थापलेल्या या संस्थेचे ते इ.स. १९६९-२००० या दीर्घ काळात अध्यक्ष होते. इ.स. १९३५पासून इ.स. १९९२पर्यंत त्यांनी मेहेकरच्या सत्र न्यायालयात वकिली केली. त्यांचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यासही दांडगा होता.

ते काही काळ नागपूर आकाशवाणीवर कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य होते. त्याकाळी आकाशवाणीवर फक्त पुरुष निवेदक असत. नाघंचे म्हणणे होते की, स्त्रियांच्या आवाजाचा स्वर पुरुषांपेक्षा उंच असल्यामुळे त्यांना निवेदक म्हणून नेमावे. त्यांची ही सूचना केंद्राने मान्य केली, व तेव्हापासून रेडिओवर निवेदिकांना प्रवेश मिळाला.

नाघंना ख़ूणगाठी या काव्यसंग्रहासाठी साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. गदिमा पुरस्कार, अनंत काणेकर पुरस्कार, विदर्भ साहित्य संघातर्फे देण्यात आलेली साहित्य वाचस्पती ही उपाधी आणि विदर्भ साहित्य संघाचा अत्यंत मानाचा जीवनव्रती पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी व मानसन्मानांनी त्यांची साहित्यिक कारकीर्द गौरवण्यात आली. इ.स. १९८४ साली त्यांच्या अमृत महोत्सवाचे निमित्त साधून विदर्भ साहित्य संघाने मेहकर येथे साहित्य संमेलन आयोजित केले होते.

फुले आणि काटे,आत्मकथन, मेहता पब्लिशिंग हाऊस (इ० स० १९९०) प्रसिद्ध केले आहे.

विदर्भातील साहित्याच्या क्षेत्रात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते

१० मे २००० रोजी त्यांचे निधन झाले, त्यांच्या अजरामर कवितांमुळे ना.घ. मराठी मनांत आजही जिवंत आहेत.

***

# वडिलांच्या व्यसनाने मुलांचे हरवलेले बालपण

**ज्योतिर्मय साहित्य**

मागील अंकावरून पुढे...

व्यसनमुक्त घर, सुसंस्कृत संस्कार आणि सुरक्षित बालपण हीच एका सशक्त आणि संवेदनशील समाजाची खरी ओळख आहे. कारण, एक वडील जेव्हा व्यसनमुक्त होतात, तेव्हा एका मुलाला त्याचे हरवलेले बालपण परत मिळते आणि त्या बालपणातूनच उद्याचा सशक्त समाज घडतो.

विनाशाच्या उंबरठ्यावरचा समाज

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे, असे आपण म्हणतो. पण आजचा समाज कोणत्या दिशेने जात आहे? तंत्रज्ञानाच्या प्रगतीने आपण आकाशाला गवसणी घातली, पण मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी एक पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठी मानवाने व्यसनाचा आधार घेतला आणि तिथेच विनाशाची ठिणगी पडली. व्यसन म्हणजे केवळ अमली पदार्थांचे सेवन नव्हे, तर ती एक अशी गुलामी आहे जी माणसाची विवेकबुद्धी नष्ट करते. जेव्हा घराचा उंबरठा ओलांडून व्यसन घरात प्रवेश करते, तेव्हा त्या घराची शांतता, समृद्धी आणि संस्कारांचा पाया डळमळीत होतो. व्यसनमुक्त कुटुंब ही केवळ एक घोषणा नसून, ती एक जगण्याची पद्धत व्हायला हवी.

व्यसनाचे बदलते स्वरूप

बाटलीपासून पडद्यापर्यंत पूर्वी व्यसन म्हटले की डोळ्यासमोर फक्त दारू किंवा गांजा यायचा. पण आज २१ व्या शतकात व्यसनाचे स्वरूप बदलले आहे.अमली पदार्थ: सिगारेट, तंबाखूपासून ते एम.डी. सारख्या घातक ड्रग्जपर्यंत तरुणाई भरकटत आहे.

डिजीटल व्यसन : तासनतास मोबाईलमध्ये गुंतून राहणे, सोशल मीडियाच्या लाईक्सच्या आहारी जाणे, हे देखील एक प्रकारचे मानसिक व्यसनच आहे, ज्यामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद संपत चालला आहे.

जुगार आणि सट्टेबाजी : ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली सुरू असलेला जुगार तरुणांना कर्जबाजारी करत आहे. एका व्यक्तीचे व्यसन संपूर्ण कुटुंबाला कसे उद्ध्वस्त करते, याचे दाहक वास्तव समाजात पावलोपावली दिसते.

आर्थिक कणा मोडणे: व्यसनाधीन व्यक्ती स्वतःच्या आनंदासाठी घराचे आर्थिक नियोजन कोलमडून टाकतो. मुलांच्या शाळेची फी, औषधोपचार किंवा साधे दोन वेळचे जेवण, यापेक्षा त्याला नशा महत्त्वाची वाटते. पर्यायाने कुटुंब गरिबीच्या खाईत लोटले जाते.

महिलांचे शोषण आणि हिंसाचार : व्यसनाच्या अमलाखाली विवेक हरवलेला पुरुष घरात आई, बहीण किंवा पत्नीवर हात उचलतो. शारीरिक जखमा भरून निघतात, पण मनावर होणारे वार त्या स्त्रीला आयुष्यभरासाठी संपवून टाकतात. व्यसनामुळे अनेक स्त्रियांचे सौभाग्य ऐन उमेदीत हिरावले गेले आहे.

मुलांचे कोमेजलेले बालपण:

ज्या घरात रोज भांडणे, शिवीगाळ आणि दारूच्या बाटल्यांचा खणखणाट असतो, तिथे वाढणारी मुले मानसिकदृष्ट्या खचतात. त्यांच्या मनात भीती, राग आणि न्यूनगंड निर्माण होतो. वडिलांचा आदर्श घेण्याऐवजी ही




मुले स्वतःच नैराश्यातून व्यसनाकडे वळण्याची दाट शक्यता असते.

समाज प्रबोधन : आता नाही तर कधीच नाही!

**भाग २**

व्यसनमुक्तीसाठी केवळ सरकार किंवा पोलिसांनी प्रयत्न करून चालणार नाही. हा लढा आपल्या प्रत्येकाच्या घरापासून सुरू व्हायला हवा.

१. संवादाची खिडकी उघडा :आजच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात मानवी संवेदना हरवत चालल्या आहेत. कुटुंबातील सदस्यांनी दिवसातून किमान एक तास एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलावे. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या मनातलं दुःख कोणासमोर तरी मांडू शकते, तेव्हा तिला व्यसनाच्या आधाराची गरज भासत नाही.

२. संस्कारांची पेरणी:

''मुलं ऐकत नाहीत, ती अनुकरण करतात.'' जर वडील मुलांसमोर व्यसन करत असतील, तर मुलाला ते चुकीचे वाटणार नाही. पालकांनी स्वतःचे वर्तन आदर्श ठेवणे हीच खरी समाजसेवा आहे.

३. सामाजिक बहिष्कार नव्हे, तर स्वीकार: व्यसनाधीन व्यक्ती ही गुन्हेगार नसून ती एक रुग्ण आहे. समाजाने अशा व्यक्तीवर बहिष्कार टाकण्याऐवजी त्याला प्रेम, विश्वास आणि उपचारांची गरज आहे, हे समजून घेतले पाहिजे.

एक व्यसनमुक्त समाज म्हणजे केवळ व्यसन न करणारा समूह नव्हे, तर असा समाज जिथे प्रत्येक व्यक्ती शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम आहे. जेव्हा तरुण पिढी व्यसनापासून दूर राहील, तेव्हा त्यांची ऊर्जा विधायक कामात लागेल. क्रीडा, कला आणि विज्ञानात आपण प्रगती करू शकू. व्यसनावर होणारा खर्च वाचल्यास देशाचे दरडोई उत्पन्न वाढेल आणि गरिबीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल.बहुतांश गंभीर गुन्हे नशेच्या धुंदीत केले जातात. व्यसनमुक्तीमुळे तुरुंगांची गर्दी कमी होईल आणि रस्ते सुरक्षित होतील.

घराचा दिवा विझू देऊ नका!

कल्पना करा, एका आईने मोठ्या कष्टाने आपल्या मुलाला शिकवले, पण तो मुलगा नशेच्या आहारी जाऊन रस्त्यावर पडलेला दिसतो. त्या मातेच्या डोळ्यातील अश्रूंची किंमत कोणत्याच नशेपेक्षा जास्त असू शकत नाही. आपल्या सुखासाठी आपल्या प्रियजनांच्या डोळ्यात पाणी आणणे हे कोणत्या प्रकारचे स्वातंत्र्य आहे?

व्यसन म्हणजे केवळ क्षणिक आनंद, पण त्याचे परिणाम दीर्घकालीन दुःख देणारे असतात. आयुष्य एकदाच मिळते, ते धुरात जाळून टाकू नका किंवा बाटलीत बुडवू नका.

व्यसनमुक्त समाज घडवणे हे एका रात्रीचे काम नाही. ही एक निरंतर प्रक्रिया आहे. आपण प्रतिज्ञा करूया की, मी माझ्या कुटुंबाला व्यसनापासून दूर ठेवीन आणि माझ्या आसपासच्या कोणालाही व्यसनाच्या खाईत पडू देणार नाही.ज्या दिवशी देशातील प्रत्येक तरुण हातातील सिगारेट टाकून पुस्तक किंवा साधन हातात घेईल, ज्या दिवशी प्रत्येक घरात संध्याकाळी भांडणांऐवजी हास्यविनोद ऐकू येतील, त्या दिवशी खऱ्या अर्थाने आपला समाज व्यसनमुक्त झाला असे म्हणता येईल.उठा, जागे व्हा आणि या व्यसनमुक्तीच्या महायज्ञात आपले योगदान द्या. कारण तुमचं आयुष्य मौल्यवान आहे आणि तुमच्या कुटुंबाला तुमची गरज आहे!

***

# गुलाबी - चित्रपट

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी चित्रपटसृष्टी सध्या नवनवीन प्रयोग करत आहे आणि याच प्रवासातील एक महत्त्वाचा चित्रपट म्हणजे गुलाबी. हा चित्रपट केवळ मनोरंजक नसून स्त्रियांच्या मैत्रीकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मांडतो.

या चित्रपटाची गोष्ट आणि त्यातील वेगळेपण चित्रपट बघितल्यातल्यावर समजले

चित्रपटाची गोष्ट नेहेमी पेक्षाही वेगळी आहे.

गुलाबी हा चित्रपट प्रामुख्याने तीन महिलांच्या मैत्रीवर आणि त्यांच्या आयुष्यातील अनपेक्षित वळणांवर आधारित आहे.

या गोष्टीची सुरुवात साध्या, मध्यमवर्गीय वातावरणातून होते, जिथे घराच्या चौकटीत अडकलेल्या स्त्रिया स्वतःची ओळख शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

सोनाली कुलकर्णी, अश्विनी भावे आणि मृणाल कुलकर्णी यांनी साकारलेल्या तीन मैत्रिणी जेव्हा एकत्र येतात, तेव्हा त्यांच्या आयुष्यात एक गुलाबी रंग येतो. हा रंग आनंदाचा, स्वातंत्र्याचा आणि स्वतः ला पुन्हा शोधण्याचा आहे.

समाजाने ठरवून दिलेल्या स्त्रीच्या प्रतिमांना छेद देत, आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करताना त्यांना कोणत्या संघर्षाला सामोरे जावे लागते, याचे प्रभावी चित्रण यात आहे.

चित्रपटाचे वेगळेपण म्हणजे हा चित्रपट इतर साचेबद्ध चित्रपटांपेक्षा वेगळा ठरतो, त्याची काही प्रमुख कारणे आहेत.

मराठी चित्रपटसृष्टीतील तीन दिग्गज अभिनेत्री, सोनाली कुलकर्णी, अश्विनी भावे आणि मृणाल कुलकर्णी पहिल्यांदाच एकाच पडद्यावर एकत्र आल्या आहेत. त्यांचा अभिनय ही या चित्रपटाची सर्वात मोठा जमेची बाजू




आहे.

स्त्री-मैत्रीची नवी व्याख्या यात साकारली आहे. सहसा सिनेमांमध्ये पुरुषांच्या मैत्रीवर




(उदा. दिल चाहता है किंवा दुनियादारी) भाष्य केले जाते. मात्र, स्त्रियांच्या मैत्रीतील गुंतागुंत, प्रेम आणि आधार अत्यंत सखोलपणे यात मांडला आहे.

चित्रपटाचे चित्रीकरण प्रामुख्याने राजस्थानमधील जयपूर येथे झाले आहे. या शहराचे सौंदर्य आणि चित्रपटाची गुलाबी थीम यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो.

अनुजा साठे यांचे दिग्दर्शन छान आहे. लोकप्रिय अभिनेत्री अनुजा साठे यांनी या चित्रपटाद्वारे दिग्दर्शन क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. एका स्त्री दिग्दर्शिकेने स्त्रियांच्या मनाचा घेतलेला ठाव हा चित्रपटाला अधिक जिवंत बनवतो.

चित्रपटातील गाणी आणि संगीत कथेला साजेसे असून मनाला उभारी देणारे आहेत. आणि अगदी हळुवार संगीत आहे.

हा चित्रपट आवर्जून बघावा.

''गुलाबी म्हणजे केवळ एक रंग नाही, तर तो स्वतःच्या अस्तित्वाचा उत्सव साजरा करण्याचा एक दृष्टिकोन आहे.''

जर नातेसंबंधातील ओलावा, स्त्रियांच्या नजरेतून दिसणारे जग आणि एक सकारात्मक कथा पाहायला आवडत असेल, तर गुलाबी हा चित्रपट नक्कीच बघावा. हा चित्रपट सांगतो की, वय कोणतेही असो, स्वप्न पाहणे आणि ती जगणे कधीच थांबवू नये.


हा चित्रपट म्हणजे खऱ्या अर्थाने गुलाबी आहे. हे चित्रपट पूर्ण बघितल्या शिवाय लक्षात येत नाही. ज्यांना काही वेगळे चित्रपट आवडतात त्यांच्या साठी पर्वणी आहे. मात्र कोणतेही विचार, पूर्वग्रह मनात ठेवायचे नाहीत. चित्रपटा दरम्यान कोणतेही अंदाज लावायचे नाहीत. तरच एका चांगल्या कलाकृतीचा व त्यांच्या बदलणाऱ्या मतांचा आस्वाद घेऊ शकतो.

# एक चिरंतन चित्रपट: मुग़ल-ए-आज़म या मराठी पुस्तकाचे विमोचन संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई : एक चिरंतन चित्रपट: मुग़ल-ए-आज़म या डॉ. मीना श्रीवास्तव यांनी लिहिलेल्या मराठी पुस्तकाचे विमोचन नुकतेच जनमंगल समूहाच्या ऑनलाईन कार्यक्रमात झाले. याच कार्यक्रमात जनमंगलच्या संपादक मंडळातील मान्यवर सदस्यांनी या पुस्तकाची लेखिका डॉ. मीना श्रीवास्तव यांची मुलाखत देखील प्रसारित केली. श्रीमती श्रेया सरनाईक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ सुमेधा हर्षे यांनी या पुस्तकाच्या एका प्रकरणाचे सुरेख अभिवाचन केले. या प्रसंगी जनमंगल टीमच्या वरिष्ठ सदस्य श्रीमती भैरवी देशपांडे आणि श्रीमती वैष्णवी बोरगावकर आवर्जून उपस्थित होत्या. टीम जनमंगल आणि लोकव्रत प्रकाशनचे सर्वेसर्वा आणि सुप्रसिद्ध लेखक डॉ. शिरीष कुलकर्णी यांनी कार्यक्रमात रंगत आणली. त्यांनी पुस्तकाच्या विविध पैलूंवर अतिशय सुरेख आणि अभ्यासपूर्ण भाष्य केले. पुस्तकाचे मुखपृष्ठ त्यांनीच तयार केले आहे. पुस्तकखरेदीसाठी ९९२०१६७२११ या व्हाट्सअप नंबरवर संपर्क साधावा.या विमोचन सोहळ्यातील डॉ. मीना श्रीवास्तव यांच्या मुलाखतीची यू ट्यूब लिंक आम्ही देत आहोत या लिंकद्वारे तुम्ही मुलाखत कधीही बघू शकता.

***https://youtu.be/Rg88qliCitw***




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# कवितेच्या लाटावर...

## प्रकाशवाटा

जखमांच्या या अंधारात, शोधते प्रकाशवाटा,
तुटलेल्या त्या स्वप्नांना, जोडते प्रकाशवाटा।
वेदनेच्या ज्वालांतून, उठते नव्या आशांची लाट,
राख झालेल्या क्षणांना, फुलवते प्रकाशवाटा।
हरवलेल्या त्या वाटसरूंना, देते नवी ओळख,
भटकलेल्या या मनाला, सावरते प्रकाशवाटा।
भीतीच्या त्या सावल्यांना, दूर सारते धैर्याने,
अश्रूंनी भिजलेल्या डोळ्यांना, हसवते प्रकाशवाटा।
जीवनाच्या रणांगणात, लढण्याची देऊन शक्ती,
हार मानणाऱ्या मनाला, उभारी देते प्रकाशवाटा।
शब्दांच्या या गाभाऱ्यात, दडलेली असते ज्वाला,
कवीच्या त्या भावनांना, व्यक्त करते प्रकाशवाटा
✨

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

## *श्रीरामा*

श्रीरामा पुरुषोत्तमा
तुचं आदर्श आमच्या मना ..
आम्ही जावु तुझ्याचं वाटेने
जपतो तुझ्याचं पाऊल खुणा
श्रीरामा पुरुषोत्तमा
तुचं आदर्श आमच्या मना ||1||


||राम जन्मोत्सव||

सेवक तु माता ,पिता ,रयतेचा
माणुनी आज्ञा कैकयीची
धरीला वनवास, सोडूनी
अयोध्या राजसिंहासना
श्रीरामा पुरुषोत्तमा
तुचं आदर्श आमच्या मना||2||

भक्त हनुमान, शबरी,लक्ष्मण
अहिल्या शिळा उद्धरी तव चरण
रावणाने केले सिता हरण
तुझ्या सेवेसी हनुमान वानरसेना
श्रीरामा पुरुषोत्तमा
तुचं आदर्श आमच्या मना||3||

मारूनिया रावण कुंभकर्ण
दानव सेना केली विदिर्ण
बिभीषण सांगे रावणाचे मर्म
नाभी भेदुनी मारीले दशानना
श्रीरामा पुरुषोत्तमा
तुचं आदर्श आमच्या मना ||4||

© विवेक द.जोशी

## बाबा तुमचं खरंच चुकलं...

मुलांसाठी आयुष्य झिजवलं
स्वत:च दु:ख सतत लपविलं
घरासाठी एवढं केलं
तुमच्या फाटक्या बनियनमधून
तुमचं हृदय आम्हा कधीच नाही दिसलं
बाबा तुमचं खरंच चुकलं ...
आमच्या अनेक चुकांवर
तुम्ही पांघरूण घातलं
प्रत्येकाचे लाड पुरवण्या ऐवजी
तेंव्हाच कान पिरगळले असते
आम्ही एवढे नालायक नसतो
बाबा तुमचं खरंच चुकलं ...
गरज जेंव्हा आमची होती तुम्हा
आम्ही आमच्या स्वार्थासाठी
तुम्हाला वाळीत टाकलं
मुली परकं धन असुनही
त्यांना तुमचं दु:ख समजलं
आम्ही मुलं असून सुध्दा
बापाचं आम्ही काही नाही केलं
आम्हाला तुमचं नाव देऊन
बाबा तुमचं खरंच चुकलं ...
आम्हीपण एक दिवस
बाप होणार विसरलो आम्ही
घरातून मुलाने हाकलल्यावर
खुप रडलो आम्ही
तुमच्यावर काय ओढवले असेल
आता कळले आम्हा
बाबा आमचे खुप चुकले
बाबा आमचे खुप चुकले...

@ संजय काव्या 7743918559

## चांदणे कैवल्याचे

भुकेल्या चकोराला चांदणे कैवल्याचे
देणे राहून गेलेले द्यायचे नक्षत्रांचे
गुलाबी हवेत सुर रेंगाळलेले मारव्याचे
मन तिथे अजुन झुलतय ते पान मेंदीचे.

राजा राणी होती भातुकलीच्या खेळातली
दिल्या घेतल्या वचनांची शपथ होती घातलेली
अशिच पहाटे केव्हातरी रात्र उलटून गेलेली
वाट जणू स्वप्नातिल इथे संपलेली.

स्वप्नामधील गावाला जाणारी ती वाट दुरची
पहाटे पांधरण्या शाल मलमली तारूण्याची
अजुनही स्मरते ती भेट त्या दिसाची
वेळ होती ह्या जन्मावर शतदा प्रेम करण्याची.

हात होता तूझा हातात हवा धुंद असताना
धरला होता हात तेव्हाही चांदण्यात फिरताना
अंधाराचे जाळे फिटले आकाश मोकळे दिसताना
मंजुळ गाणी ऐकू आली प्रितीचं पाणी वाहताना.

राजस जरी निजला तरी रात्र तरूण आहे अजुनी
एकाच ह्या जन्मी जन्मेन मी जणू नवी फिरूनी
जुळल्या जेव्हा त्या आठवणी तेव्हा स्वर आले दुरूनी
भाव मनातले कधी कळतिल पाहिले विचारूनी.

मिलन व्हावे आपले ऐसे सांगून गेला गंध फुलांचा
रात्री चालतो खेळ त्या गुढ चांदण्यांचा
ओझे कुणाचे अन भार उचलण्या खांदा कुणाचा
प्रवास असावा आयुष्याचा चांदणे शिंपित जाण्याचा.

©शेखर देशपांडे

## कहाणी ही मनामनांची

माझ्या मना सांग काय हवे तुला
कुणी न दिले काही कधीही तूला
नको दू:खी होवूस माझ्या मनफुला
फुलांसम सुगंध देत राहा मनफुला!

जग आहे सारे सुखदू:खाने भरलेले
त्यासम सद्गुणाने, दुर्गूणाने भरलेले
सांप्रती! कुणी न कुणाला सुखवितो
जो तो आपला सदैव स्वार्थ साधितो

समाजातील काही जन दूष्ट, दूर्जन
छळिले त्यांनी सदैव संतसज्जनांना
न जाणिले कधी कुणी तयां मनाला
तरीही,त्यांनी उद्धरिले सर्व जगाला

शतकांतील मनांची आहे हीच कहाणी
जाणावी सा-यांनी निज अंत:करणी
मनमनांतील सद्भाव जपावा जीवनी
सार्थक करा जीवनाचे तनमन अर्पूनी

काव्यरचना: मधुकर निलेगावकर,पुणे
९४२१३७५६९१

## आतुरता रामजन्माची..

या जगातील सगळ्या गोष्टींची जबाबदारी भगवंताची आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही, एवढाच काय तो फरक आहे.....

पृथ्वी, जल, आप ,वायू, अग्नी तर त्याचेच जीवाचा श्वास ही "त्याचा" आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे....

दृश्य, अदृश्य, ऊन ,सावली, सुख दुःखाचा तोच द्रष्टा आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे...

निर्माता तर आहेच पण निर्मितीचे कारणही तोच आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे...

साधु संतांनी हे ओळखले व त्याला जाणले आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे ...

मानणे न मानणे हया पलिकडचे अस्तित्व "तो" आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे....

गुह्यतम हे ज्ञान हेच केवळ सत्य आहे कुणी मानतं कुणी मानत नाही
एवढाच काय तो फरक आहे....

ज्याने जाणले त्याला त्याचाच तो आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे....

त्याला जाणल्यावर जाणण्याचे काही शिल्लक रहात नाही
स्वत:तच त्याला अनुभवल्यावर वेगळे काही असत नाही...

स्वानंदाचा हा आनंदकंद निर्मितेचे कारण आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे....

"शीतोष्ण सुख दुःखेषु" असा तो स्थितप्रज्ञ ज्ञानी आहे
कुणी मानतं कुणी मानत नाही एवढाच काय तो फरक आहे...

मानणे, न मानणे अंध:कार संपला फरक ओळखून जगी
"सुवर्ण मध्य" साधला... सत्यमेव जयते, आत्माराम (च) राजाराम
भगवंत हृदयस्थ आहे..

✍️अपर्णा परांजपे पुणे

## तुझ्यासारखी तूच आहेस...

तुझी पाठ वळतच नाही
मी अजूनही येते खिडकीत
आवाज आला की पण
तू वर आधीसारखा बघत नाहीस

संसारात इतक झोकल ना मी
तारेवरची कसरत संपत नाही
लक्षात आलच नाही, मनात येऊन गेल
फिगर, पार्लर केलच नाही

हळूच ठेवला कागद त्याच्या
उशाशी, शेवट लिहल बदलू का?
मी स्वत:ला,? तूच सांग उत्तर काही
उत्तर दिल होत त्याने, अग अस काही नाही

दिवसभर धावतेस, झटते सगळ्यांसाठी
थकलेली असतेस, गाढ झोपेत असतेस तू
तेव्हा बघत राहतो तुझ्याकडे, भान हरपून काही
विसावा हवा तुला पण म्हणून
उठवावस वाटत नाही.



तुझ्या मनाचा निरागसपणा,
सहन करत, दु:खाचे घोट पचवण,
हे मला कधी दिसलच नाही अस नाही

तुझ्यातला गोडवा, आपुलकी,
दिवसेंदिवस सुंदरता वाढवते तुझी,
फिगरच, पार्लरच
नसत सर्व काही.

व्यायाम करावा, पण नको बदलू
स्वत:ला, आटापिटा करुन माझ्यासाठी
सुंदरता म्हणजे hot अशी माझी
तरी व्याख्या नाही

वरवरची सुंदरता, सदा रहात नाही
तुझ्यासारखी तूच आहे तशीच रहा
मला आवडतेस तू,
शब्दात कशाला आता सांगायचे काही?

एक तिरका कटाक्ष टाकतो
मी तु खिडकीत असताना
हलकेच बट मागे घेऊन जातेस ना,
मी ती तुझी छबी आठवत राही

नको बदलू वेडे स्वत:ला,
मी तुझ्यात, तू माझ्यात
इतकी एकरुपता होई

गुंफलेले हात आपले हीच देती
प्रेमातल्या सुंदरतेची ग्वाही.

✍️ माधुरी पळणिटकर,
सातारा

## कविता

गंध गेला रानावना रानफुलांच्या
दर्पात हरवला थंड गारवा,
उठतीहिरव्या कोमल गवतावरच्या
पावलांना ही लागे थंडावा
शहारून ही तृणपाती, अलगद
काढता डोके वरती
गवतफुलेही थरारत हळूच सुखद
रानदर्पात नाहती,
भिरभिरणाऱ्या वाऱ्यालाही
न झेपे थंडीची लहर ती
उगाच मारी फेर्यां पण हितगुज
कोण न करिती।
शांत, स्तब्ध सारे, थांबले कां
मित्र, गारठून गेले,
आता वार्तालाप कसा करू मी
नाही कुणी सोबती।
अवघडलेल्या वेलींना ही
वृक्ष कसे सावरू बघती,
ढोलीत तरूच्या, पांखरेउब शोधती
दवाचे मोती विखुरती।
वसुधा अवघडली थंडीत गारठली
गगनी मेघदाटी झाली
गडद धुक्यात शुभ्रसूर्य किरणे कुठे
गवाक्षे शोधित हरवली।

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
मुंबई विरार



## पंढरीचा विठूराया

पंढरीचा विठूराया
काल माझ्या स्वप्नी आला
कसं काय चाललंय गिरू,
मजेत ना? विचारू लागला

मी म्हणालो, विठूराया
बरं झालं भेटलास मला
जे जे हवं प्रत्येकाला
ते ते का देत नाही आम्हाला?

माझा प्रश्न ऐकून मग
विठूराया हसू लागला
मला म्हणाला, भक्ता सांग
काय कमी आहे तुला?

चोवीस तास घरी बसतो
मस्त पेन्शन खात असतो
कधी एखादं दु:ख झालं
की मला दूषणे देत बसतो

गाडी आहे फ्लॅट आहे
खाण्यासाठी पोट आहे
जे जे हवे ते ते खातो
तरी तुझी वटवट आहे

अरे वारकरी म्हणून जग एकदा
तुझ्या गूर्मीतून बाहेर ये
भिजवणाऱ्या पावसात मस्त
एकदा तरी वारी करून घे

बघ कशी मायाळू असतात?
सारी ती मंडळी वारकरी
मनी नसते कुठली आशा
फक्त पोटापुरती ठेचा भाकरी

विठ्ठल विठ्ठल जय हरी म्हणत
त्यांच्या सोबत बघ जाऊन
त्यांच्या सवे जेवायला बस
ठेचा भाकरी बघ खाऊन

मोह माया पैसा स्वार्थ
म्हणशील सारं काही क्षणांचं
त्यांच्या संगे चालतांना तुला
कळेल सुख जगण्याचं

मग विचार तूझ्या मनाला?
पंढरीच्या वारीत कसं वाटतं?
तेथे माझं तुझं काहीच नसतं
सारं काही विठूमय असतं

आता तरी तू जागा हो
बाहेर ये रे स्वप्नातून
विठू नामाचा गजर कर
वेळ काढ संसारातून.
✍️©®✍️
गिरीश खं. वसेकर
नांदेड सिटी,पुणे, ९४२२६५९४००


## मावशीपण लेकराची माय असते

वृत्त_ मंजुघोषा

फायद्याचे अर्थकारण काय असते ?
कावळ्या अन बावळ्यातच टाय असते.

भेसळीने रंग येतो पांढरापण
जीवघेणी त्या दुधाची साय असते.

दुष्मनी होईल हलकी भोजनाने
माणसांना जोडणारी चाय असते.



तीच दुधदुभते, पनिर अन ताक देते
लेकरांना पोसणारी गाय असते.

बांधते ती रेशमाचा दोर हाती
ऐश्वर्याला सोडणारी ताय असते.

ना लुटावा घास गरिबाचा कधीही
दीनदुबळी तळतळाटी हाय असते.

बालपणी माय गेली जर कुणाची
मावशीपण लेकराची माय असते.

✍️ रज्जाकभाई शेख🌿* 9665778558

## जाणीव

आनंदमय जीवन जगू
घेऊ वर्तमान हर्ष
रुसवेफुगवे त्यागू
साधू जीवन उत्कर्ष

आपले करू सर्वांना
द्वेष, मत्सर त्यागून
स्नेह टिकवू सर्वांशी
दिल्या शब्दास जागून

करू अथक साधना
सार्थ ठरवू जीवन
सोडून चिंता, वेदना
जिंकूया जीवनरण

श्रम करू निरंतर
भरून काढू उणीव
साध्य करूया यशश्री
ठेऊ स्वमनी जाणीव

मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल,
छत्रपती संभाजीनगर.

## जी आईचा संघर्ष बघते



ती कधीच आईकडून अपेक्षा
हे दे ते दे मागत नसते.
करतेच हेच खूप आहे हे ती तिला
सांगत असते.
दूध पोळी साखर सुद्धा ती
पक्वान्न समजून खाते पण
आई तू झोप बरे नाही तुला
सांगत ती तिची आई होते
नसेल जमले तिला टापटीप रहायला
बाहेरचे जग बघायला तीच्यावरची बंधने
तिचा त्याग ती मुलगी पहात मोठी होते
म्हणून ती अडाणी असे
चुकूनही ती म्हणत नसते.
तिला पंख असून उडता आले नाहीत
हे मुलगी समजून घेत असते.
वडिलांनाही ती आईला काहीच
बोलायचे नाही हे ती दटावून सांगत असते.
रोज बालपण आठवायचं
का ? तर आई ला उलटून एकही
वाक्य येत नाही हे माझं शिक्षिकेच
सांगणं मुलांना असते.
आईपासून दूर गेल्यावर कोणी नसते आपले
हे ज्यांना कळते तेच सांगतात
सर्वांना तुम्ही जपा आईला
बस एक प्रेमळ मिठी
दुसरे अजून ती काही
मागत असते.
किती वयस्कर आई होऊ दे
ती तू जेवलास का ? जेवलीस का ?
हेच विचारत असते
हेच मातृत्व असते.
हे ज्यांना कळते ते आई
वडिलांना वृद्धश्रमात टाकत
नसतात. श्रावण बाळ होऊन
त्यांना आधार देतात
हेच जन्मो जन्मीचे पुण्य
ते कमवत असतात.
आईवेडी एक लेखिका
आपल्या भावना शब्दात
व्यक्त करत मुक्त मन करत असते.

✍️माधुरी पळणिटकर 9921495533

## तारणहार

कटेवरी कर, आता कुठवर
करी समशेर, धरी आता

कुठवर सांग, सहावा अन्याय
पांडुरंगा न्याय, करी आता

कसा हाहाकार, माजला अपार
पुन्हा अवतार, धरी आता



तू तारणहार, करुणा सागर
तुजविण कोण, तारी आता

संदीप साकरे (नाशिक)
भ्रमणध्वनी: ९८२००३७५४५

## !!आई!!

अकालीच का देवाघरी गेली आई
संपली संपली माया माहेरची सारी
ओसाड वाटा आटला मायेचा झरा
थांबली थांबली बाई माहेरची वारी

कावराबावरा जीव हाक कानी न येई
राख विझुनी जाता आस विझुनी जाई
कोडकौतुक माझे बाई आता होणे नाही
हळूच कुशीत आता शिरणे नाही आई

कानमंतर तुझे अनुभवाचे बोल नाही
छोट्या यशात माझ्या तुझे हुरळने नाही
जग जिंकल्याचे आता भास नाही
जीव ओवाळून टाकणारा जीव नाही

मनातले गुपित सांगया ना कोणी
दिल्या घरी सुखी रहा सांगे लेकी
थांबले थांबले बाई येणे जाणे
परकी झाली अंगणातली सई

डोळ्यातून वाहे आसवांचा पूर
संपली प्रेमळ माऊलीची साथ
निघाली लेक वाटे लई दूर दूर
थांबवाया नाही वृद्ध थरारते हात

संपली संपली माया माहेरची सारी
थांबली थांबली बाई माहेरची वारी

अर्चना हिंगलजकर,शिरवळ
9225527464

## सहज ..

दोषदुजा कशास्तव
मीचं फसलो सहज
प्रवृत्तकरतो चोरांस
उघडा ठेवला ऐवज

नितीमत्ता दडूनबसे
गुन्हा घडविते गरज
लोभस वस्तु खुणवे
निखळून पडे धीरज

कुणा नसतो अंकुश
योग्य वेळी दे समज
शुध्दी बुध्दी हरवली
होवूनजाय असमज

अडकताजाळ्यामधे
कितीकरतो गजबज
लिलाव चाले अब्रुचा
बाजारात रे बजबज

आंधळे करे डोळसां
अंधश्रद्धा क्रूरआरज
काळसर्पा गिळंकृती
उच्च शिक्षीत सावज

मलिन होते क्षणार्धा
जपले चारित्र्य नीरज
अघोरीनिर्लज्ज पूजा
थरारु टाकले काळज

कळले नाही कधी ते
डागाळले मन विरज
चारित्र्य हनन मनस्वी
मातीमोल हो दिग्गज

- हेमंत मुसरीफ, पुणे
9730306996.

## नियुक्त ..

प्रशासनाचा खंबीर
कणा असे आयुक्त
मुद्दा ठरतो वादळी
कुणांस करे नियुक्त

शासन नि प्रशासन
रे जबाबदारीसंयुक्त
समन्वय दोघां मध्ये
असो अति उपयुक्त

फुले दिसतात सुंदर
तीक्ष्ण काटेरी तख्त
बांधे अदृश्यशृंखला
जरीवरुन दिसे मुक्त

नियमित कामांपेक्षा
भार इतर अतिरिक्त
एक जागा भरे जरी
दुसरी खळगी रिक्त

मोकळीअसावी मने
संशय नको अव्यक्त
स्पष्ट हवेत व्यवहार
चूक होता व्हा व्यक्त

मंत्री अन् अधिकारी
राजे ना अनभिषिक्त
दोन्ही आहेत चाकर
कारभार हवे सशक्त


बिघडूनि जाई राज्य
कुणीही होता विरक्त
जन सेवा ब्रीदवाक्य
कुणी न पडो अशक्त

## प्रकाशवाटा

उसवुनि काळोख सारा उगवे प्राची,
पेरित किरण पसारा कधी धुंद सुगंधी,
सारीकडे लहरत फिरे अनिल बावरा
वेड्यामना उठ आता, क्षीण घालवुनि
थकल्या जड तनाचा
रम्य उषा हसते, रंगऊनी गुलाबी गाली
केशरी किरण तोरा.
🌄
सुवर्णमेघ गवाक्षातुनि रेखिती
सुंदर रंगावली वसुंधरेवरी
किलबिलणारे खगही गगनी उडती
भक्ष्यासाठी घेती भरारी
अंधाराचे मावळले कवडसे प्रकाशाचे
साम्राज्य अवनीवरी पसरले
हरित तृणांच्या पात्यावर, थेंब दवाचे
चमचमती रानगंधी फुलांवरी.
🌄🌄
प्रफुल्लित प्रसन्न वातावरणी,
दिन उगवे रोज नवकार्याचा
विस्मृतीत सोडून कालची चिंता मनी
नको उगा उदास होऊ
पुसून टाक काळोखसारा,
तुजसाठी रविकिरणांच्या प्रकाशवाटा
नवनिर्मितीच्या कौशल्याचे,
आनंदाने रोज नवे गीत गात गाऊ.
🌄🌄🌄

शीघ्रकाव्य
स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कलाशिक्षिका

# बाल वॉर्डबॉय



**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबईच्या मोठ्या हॉस्पिटल मध्ये एक आठ वर्षाचा गावाकडचा मुलगा अॅडमिट झाला होता. त्याचा आजार तसा भयानक वगैरे नव्हता, पण त्याला पित्ताशया जवळ एक छोटी गाठ होती. त्या गाठीची शस्त्रक्रिया करण्यासाठी म्हणून त्याच्या घरच्यांनी मुंबई मध्ये नेले होते. त्यांच्या गावातील कौटुंबिक डॉक्टरनी उपचारासाठी मुंबईला जाण्याची सल्ला दिला होता.

त्याची शस्त्रक्रिया योग्य पध्दतीने पूर्ण झाली. कोणताही त्रास झाला नाही. पण तिथे पुढच्या देखभालीसाठी पंधरा ते वीस दिवस रहायला सांगितले होते. तसेच आणखी एकदा पुन्हा पुढच्या उपचारासाठी येण्यास सांगितले होते. त्याच्या घरची परिस्थिती तशी बेताची होती. पण पहिलाच मुलगा असल्याने बरा करण्यासाठी मुंबईस नेलं होतं.

त्याला ज्या वॉर्डमध्ये ठेवले होते. त्या वॉर्डची मुख्य सिस्टर ही पण त्यांच्या जिल्ह्यातील होती. त्यामुळे थोडीफार जवळीक वाटत होती. तिचे नाव होते पार्वती, पण सगळे तिला फूफू म्हणत.गावाकडचाच हा उपचार घेणारा गोविंदा त्याला सगळे जण गोंद्या म्हणत.हा गोंद्या आणि सिस्टर फूफू त्या पन्नास खाटांच्या वॉर्डमध्ये सगळ्या रुग्णांना औषधे द्यायला दोघे जात असत.फूफू गोळ्या औषध रुग्णाच्या तोंडात टाकायची आणि गोंद्या पाणी टाकायचा. त्याच्या बेडवर त्याच्या पेक्षा त्याच्या बरोबर आलेली त्याची आजीच झोपून रहायची,आणि हा वॉर्डभर फिरत रहायचा. आजी म्हणजे त्याचं सर्वस्व होतं. सगळ्या रुग्णांना औषधे देण्यास मदत करणे,म्हातार्या माणसावर पांघरूण टाकणे, पाणी नेऊन देणे, हाताला धरून बाथरूमला नेणे, पुन्हा घेऊन येणे,नास्त्याच्या वेळी सर्व रुग्णांना फळ ब्रेड चहा देण्यास मदत करणे,अशी कामे तो करीत होता. त्यामुळे गोंद्या सर्वांचा लाडका झाला होता. सगळ्या रुग्णांना तो गोकुळातला कृष्ण वाटू लागला होता.

सकाळ सकाळी उठल्यावर व रात्री झोपी जाण्यापूर्वी तो सर्वांना संगीत ऐकवीत असे. त्याला पोवा खूप छान वाजवता येत होता. सकाळी भक्ती गीत तर रात्री सिनेमा मधील गीत वाजवायचा. सकाळी कधी केशवा माधवा तुझ्या नामात रे गोडवा।।तर रात्री देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा।।हे गीत सगळ्यांना ऐकवायचा. त्याच्या या दोन्ही गाण्यावर रुग्ण फिदा झाले होते. फूफू बरोबर जमलेली गट्टी आणि रुग्णांशी साधलेली जवळीक, यामुळे तो सगळ्या हॉस्पिटल मध्ये प्रसिद्ध झाला होता.

फूफू तशी मध्यम वयाची होती. तिलाही त्याच्या सारखाच मुलगा आहे. त्यामुळे लहान मुलांशी त्यातल्या त्यात रुग्ण मुलांशी कसं वागायचं हे तिला माहिती होतं.त्यामुळे त्या दोघांची गट्टी जमली होती. एके दिवशी डॉक्टरांनी त्याची पहाणी करुन दोन दिवसांनी तुला हॉस्पिटल मधून सोडले जाईल असे सांगितले. तसं सांगितल्या पासून तो एवढा नाराज झाला की बस्स.त्या दिवशी तो कुणाला बोलला नाही, पोवा वाजवला नाही, नीट जेवण केले नाही, कुणाला औषध गोळ्या द्यायला गेला नाही. शेवटचा दिवस उजाडला आज त्याला सोडले जाणार होते. सकाळीच लवकर उठून त्याने पोवा काढला आणि सगळ्यांना त्याच्या संगीताने जागं केलं.पोवा वाजवत असतानाच त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. एका रुग्ण आज्जीनं उठता येत नसून कशीबशी उठून त्याच्या जवळ हळूहळू गेली. आपल्या पदराने त्याचे डोळे पुसले त्याचा आलाबला घेतला. आपल्या कमरेच्या पिशवीतून वीस रुपयांची नोट काढून त्याच्या खिशात घातली. तू माझा खरा कृष्ण आहेस म्हणून त्याच्या अंगावरून हात फिरवित राहिली.

दहा वाजता फूफू तिच्या वेळेवर हॉस्पिटल मध्ये आली. ती दिसताच गोंद्या पळतच गेला आणि तिला मिठी मारुन ओक्साबोक्शी रडू लागला. आज पर्यंतच्या त्याच्या लडिवाळ साथीची सवय झाली होती. त्यामुळे तिलाही गहिवरून आले. दोघांच्याही डोळ्यातून आसवं टपकत होती.

उपस्थित डॉक्टर, वॉर्डबॉय,इतर सिस्टर यांना हा सुखाचा सोहळा अगदी नवीन होता. आजीने दिलेल्या वीस रुपयातील दहा रुपयांचा गुलाब त्याने गुपचूप आणलेला तिला दिला आणि फूफूने त्याला आणखी घट्ट मिठी मारली.हॉस्पिटल मधून बाहेर पडताना त्या वॉर्ड मधील बरेचजण त्याला सोडविण्यासाठी बाहेर पर्यंत आले होते. खरच जीवनमरणाच्या सीमेवरील तो एक अद्भुत व अलौकिक असा क्षण होता!!

**– दत्ता तरलगट्टी**
मुक्त पत्रकार,
पंढरपूर.
९८८१६२९०४८

# अनिका आणि अवनी

**ज्योतिर्मय साहित्य**

अनिका ही चौथ्या इयत्तेत शिकणारी, चुणचुणीत आणि सगळ्यांची लाडकी मुलगी. अभ्यासात हुशार, खेळात चपळ आणि गप्पांमध्ये चॅम्पियन! शाळेत आली की वर्गात चैतन्य पसरून जायचं. मात्र तिच्या वर्गातील एक मुलगी अवनी, पूर्ण वेगळी होती. शांत, कोमल आणि कमी बोलणारी. कोणी काही बोललं तरी हसून उत्तर द्यायची, पण स्वतःहून कधी बोलायची नाही.

अनिकाची आणि अवनीची काही विशेष मैत्री नव्हती. अनिकाला वाटायचं, ‘‘इतकी शांत राहणारी मुलगी म्हणजे कंटाळवाणीच असणार.’’ कधी कधी इतर मुले अवनीची चेष्टा करत आणि अनिका त्यांना काही उत्तर न देता गप्पच राहायची. तिला नेहमी वाटत असे मी काही चुकीचं तर करत नाही ना? म्हणून तर ही मुले माझी चेष्टा करीत नाहीत ना?

एक दिवस शाळेत विज्ञान प्रदर्शन जाहीर झाले. प्रत्येक गटाने एक मॉडेल बनवायचं होतं. शिक्षिकेने गट निश्चित केले, आणि योगायोगाने अनिका– अवनी एकाच गटात आल्या. अनिका थोडी नाराज झाली. ‘‘ही बोलतच नाही, तर हिच्या सोबत कसं करायचं काम?’’ असा विचार तिच्या मनात विचार आला.

संध्याकाळी दोघी शाळेनंतर विज्ञान प्रदर्शनाबद्दल विचार करीत बसल्या. अवनीने हळू आवाजात विचारलं, ‘‘अनिका, आपण पाण्याची बचत कशी करावी यावर मॉडेल करूया का?’’

अनिका थोडी चकित झाली, ‘‘अगं, ही तर खूपच छान कल्पना आहे! पण तुला सुचली कशी?’’

अवनी हलकेच हसली. ‘‘माझ्या आई–वडिलांनी नेहमी शिकवलंय – पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य असतो. म्हणून मला हे करावंसं वाटलं.’’

त्या क्षणापासून अनिकाच्या मनात काहीतरी हललं. पहिल्यांदाच तिने अवनीकडे वेगळ्या नजरेने पाहिलं – शांत असली तरी किती विचारी मुलगी आहे! तिच्या आत किती मोलाचा विचार दडलेला आहे!

पुढचा आठवडा दोघी मिळून काम करत राहिल्या. अवनी अत्यंत कल्पकपणे मॉडेल सजवत होती. पाईपमधून खाली पडणारे थेंब, साठवलेलं पाणी, पुन्हा वापरण्यासाठी वेगळे टाक्या – सगळं इतकं बारकाईने! अनिका भारावली. ‘‘मी तिला आजवर कमी का लेखलं?’’ असा प्रश्न तिला सतावत राहिला.

प्रदर्शनाच्या दिवशी दोघींनी आत्मविश्वासाने आपलं मॉडेल सादर केलं. अवनीनं अतिशय स्पष्ट आणि सुंदर शब्दांत पाण्याची बचत कशी करावी हे समजावून सांगितलं. प्रेक्षक कान देऊन ऐकत होते.

निकाल जाहीर झाला अनिका आणि अवनीचा गट पहिला आला!

मुख्याध्यापक आणि इतर शिक्षकांनी दोघींनाही छान भेटवस्तू देऊन दोघींचे खूप कौतुक केले.

सगळे टाळ्यांचा कडकडाट करत होते. पण अनिकाच्या मनात काही वेगळाच विचार चालू होता. तिने सर्वांच्या समोर अवनीचा हात धरला आणि मोकळेपणाने म्हणाली,

‘‘मी एक मोठी चूक केली. अवनी नेहमी शांत असते म्हणून मी तिला कमी लेखलं. पण खरी श्रीमंती बोलण्यात नसते, तर मनातल्या गुणांमध्ये असते. आज अवनीने मला ते शिकवलं!’’

अवनीच्या डोळ्यांत पाणी आलं. तिने अनिकाला मिठी मारली. दोघींच्या मिठीमध्ये खरी मैत्री फुलली.

**– उद्धव भयवाळ**
छत्रपती संभाजीनगर

# कष्ट करी तो फळ चाखी

**ज्योतिर्मय साहित्य**

एका डोंगराच्या पायथ्याशी आनंदपूर नावाचं एक छोटंसं गाव होतं. त्या गावात राघू आणि विष्णू नावाचे दोन मित्र राहत होते. राघू स्वभावाने अत्यंत साधा, प्रामाणिक आणि कष्टाळू होता, तर विष्णू कायम कमी श्रमात जास्त नफा मिळवण्याच्या आणि खोट्या प्रतिष्ठेच्या मागे धावणारा होता.

एके वर्षी गावात मोठी जत्रा भरणार होती. राघूने आपल्या शेतातील ताज्या भाज्यांचं दुकान लावण्याचा विचार केला. त्याने अहोरात्र मेहनत घेतली, वेळेवर खतपाणी दिलं आणि उत्तम भाज्या पिकवल्या. विष्णूने मात्र सोपा मार्ग निवडला. त्याने स्वस्त दराने जुन्या भाज्या आणल्या आणि त्या ताज्या दिसाव्यात म्हणून कृत्रिम रंगाच्या पाण्यात भिजवून जास्त दराने विकण्याचा डाव आखला.

काही दिवसांनी जत्रा सुरू झाली. विष्णूने मोठ्या थाटात आपलं दुकान सजवलं. त्याने चकचकीत पण निकृष्ट दर्जाचा माल मांडला होता. दुसरीकडे राघूचं दुकान छोटंसं होतं, परंतु तिथे मातीचा सुगंध असलेल्या ताज्या भाज्या होत्या. सुरुवातीला विष्णूच्या दुकानाची रोषणाई पाहून लोक तिकडे वळले, पण दोन दिवसांतच त्याच्या भाज्या सडू लागल्या. काही लोकांच्या आरोग्याच्या तक्रारीही वाढल्या आणि विष्णूने लोकांची फसवणूक केल्याचं उघड झालं.

गावकऱ्यांनी विष्णूला जत्रेतून हाकलून दिलं. तेव्हा राघूचे वडील त्याला म्हणाले, ‘‘बेटा विष्णू, अति शहाणा त्याचा बैल रिकामा. तू स्वतःला खूप हुशार समजत होतास, पण तुझी ही खोटी हुशारी तुलाच महागात पडली.‘‘

विष्णूला आपली चूक उमजली नाही. त्याने रागाच्या भरात आपला उरलेला माल नदीत फेकून दिला आणि विचार केला की, ‘‘आता मी एखादा मोठा व्यापार करून राघूला हरवतो.‘‘ त्याने कर्ज काढून कपड्यांचा व्यवसाय सुरू केला, पण अनुभवाशिवाय आणि नियोजनाशिवाय केलेल्या या कामात त्याचं मोठं नुकसान झालं. त्याचं घरही गहाण पडलं. दुसरीकडे राघूने हळूहळू पण सातत्याने कष्ट करून आपलं घर आणि शेती समृद्ध केली.

शेवटी विष्णू रडत राघूकडे आला. तेव्हा राघूने त्याला समजावलं, ‘‘अति लोभ हा अंती दुःख देतो, आणि लक्षात ठेव मित्रा, खाल्ल्या घरचे वासे मोजू नयेत. तुला ज्या गावाने आधार दिला, तिथेच तू फसवणूक केलीस. पण हरकत नाही, आता तरी मेहनत कर.‘‘

विष्णूला आपल्या चुकीची जाणीव झाली. त्याला समजलं की आयुष्यात शॉर्टकट नसतात. त्याने आपली चूक सुधारली आणि राघूच्या सोबतीने प्रामाणिकपणे कष्ट करायला सुरुवात केली.

बोध – प्रामाणिक कष्ट आणि वेळेचं महत्त्व जाणणारा माणूस आयुष्यात कधीच अपयशी होत नाही; फसवणूक, आळस आणि लोभ विनाशाला कारणीभूत ठरतात.

**– मंगेश दौंडकर (पुणे)**
**मो. नं. ९८९०६१९३५४**



# लहान मुलांना राग का येतो?

**ज्योतिर्मय साहित्य**

साधारणपणे मुले ४ ते ५ वर्षाची झाली की हळूहळू त्यांचा स्वभाव आई बाबांना समजायला लागतो. या वयापर्यंत त्यांना बोललेले चांगले समजायला लागते, जिभेची चव कळायला लागते, कार्टून आवडायला लागतात, मोबाईल हातात घेऊन स्क्रीन टाईम वाढायला लागतो, हे आणि असे सर्व करता करता मग आपल्याला काय आवडते? आणि काय नाही ? याची ओळख पटते आणि मग आवडीचे पदार्थ, गोड पदार्थ, चॉकलेट, आवडीच्या वस्तू, मोबाईल या या गोष्टी नाही मिळाल्या की मुल रडून ते मिळवण्यासाठी हट्ट करतं आणि येथे ते रडू नये म्हणून आई आणि काही अपवाद वगळता काही ठिकाणी बाबा लोक ही अश्या मुलाचा हट्ट पुरविण्याचा प्रयत्न करतात आणि येथेच चुकीला सुरुवात होते.

कारण हळूहळू अशीच सवय मुलाला लागत जाते आणि त्याला कळते की, आपण रडलो की आपल्याला हवे ते मिळतं आणि मग नाही हा शब्द त्याला अवगत होत नाही. म्हणून पालकांनी जरी कुणाला एकुलता एक मुलगा, मुलगी असेल तर असे अतिलाड करू नयेत. अशी उदाहरणे आहेत की, काही मुलं राग व्यक्त करण्या करता कधी कधी आदळआपट करतात, काही हातातील वस्तू फेकून देतात, काही मुलं अंथरुणात जाऊन मोठ्याने हुंदके देतात, काही ठिकाणी तर अश्या मुलांनी रागराग करत आईच्या वेणीचे केस ही ओढल्याचे उदाहरण आहेत.

आणि मग आई लाडाने काही तरी आणून देते आणि मुलाच्या मेंदूला कळते की आपण असे काही केले की आपल्याला काही तरी हवे ते मिळते आहे.

पालकांनी असे मुळीच करू नये कारण मुलांच्या भविष्यासाठी हे मुळीच चांगले नाही. प्रत्येकालाच आयुष्यात हवी ती गोष्ट मिळतेच असे कधीच नसते. त्यामुळे आई बाबांना अश्या लहान मुलाला, नाही, हे मिळणार नाही हे स्पष्ट सांगायला हवेच, कमीत कमी बाबांनी तरी सांगायलाच हवे. पालकांनी मुलाला टप्पू मारावेत हे येथे मुळीच अभिप्रेत नाही पण थोडा तरी धाक असणे आवश्यक असते. आईने मुलाला म्हंटले पाहिजे, शांत बस नाही तर बाबांना कळले तर मग टप्पू खाशील. लहान मुलांना ज्या गोष्टी आवडत नाहीत, तिकडे ते पाठ फिरवतात कारण त्यांच्या मेंदूला आनंद कळायला लागलेला असतो पण कोणतं चांगलं ? आणि कोणतं वाईट? हे मात्र या वयात कळत नसतं. काही पालक आपल्या मुलाच्या रागाचं कोड कौतुक करून इतरांना मुलासमोर सांगत असतात, त्यांना आपल्या मुलाचा अभिमान वाटतो हे ठीक आहे पण मुला समोरच असं सांगणं चूकच कारण ते मुल हे सारं ऐकत असतं आणि मग त्याचा मेंदू आणखी काही तरी नवीन मागणी करतो. त्यामुळे पालकांनी मुलाचा लाड करावा पण अतिलाड नको. खायला गोडधोड दयावे पण अति गोड, नियमित नको, कधी तरी हवी ती वस्तू दयावी पण प्रत्येक मागणीला हवी ती वस्तू लगेचच आणून देणे चूकच. या साऱ्या गोष्टी पाळल्या आणि मुलगा प्ले ग्रूपमधे / बालवाडी मध्ये जायला लागला की त्याला बाहेरच्या जगाशी भेट व्हायला लागते. मित्र मैत्रिणी भेटतात, ओळखी वाढतात पण सोबत ते मित्र मैत्रिणी,त्यांच्याकडे असलेल्या वस्तू याकडे लक्ष आकर्षित होते आणि जे आपल्याकडे नाही त्यासाठी ते हवे म्हणून ते आपल्या आईच्या मागे त्यासाठी तगादा लावतात. त्यामुळे वेळीच हा खेळ थांबला पाहिजे कारण हातची वेळ गेली आणि असं मुल थोडं मोठं झालं की जास्त हट्टी होऊ शकतं. म्हणून पालकांनी मुलाच्या अश्या स्वभावाला वेळीच आळा घालावा आणि पालक म्हणून चुका होऊ देऊ नयेत अन्यथा भविष्यात फक्त चूक चूक करण्याची वेळ येऊ शकते, यात काही शंका नाही.

**– गिरीश खं.वसेकर**
नांदेड सिटी, पुणे
९४२२६५९४००



## सुट्टीचे दिवस

सुट्टीचे दिवस आता मजा करू
मित्रांना जमवू खुप मस्ती करू

केली शाळा, अभ्यास खूप केला
सुट्टीचे दिवस,मस्ती मौसम आला

सुट्टीचे दिवस, आराम करायचा
वेळ आळसात ना घालवायचा

दाखवू पेपर वाचून आजोबांना
खूप आनंद होईल आजोबांना

आपण आणायचा घरचा खाऊ
बागेत बसून सारे मिळून खाऊ

भाईशी भांडाभांडी मुळीच नाही
दिदीवर रुसणे अजिबात नाही

आराम करायला लावू आईला
मदतीने आनंद वाटावा आईला

**– अरुण वि.देशपांडे–पुणे**
९८५०१७७३४२



## सुट्ट्यातील मजा

सुट्ट्या आहेत मजा करू
चला मित्रांनो खेळ खेळू
पाऊस पडला रान हिरवे
चला चला शेताकडे पळू

झाडापाशी जाऊ शोधू फळे
हलवून फांद्या पाडू पेरू
गप्पा मारत हिरवळीवर बसून
मस्त खायला करू सुरू

संपता पेरू डाळिंब खाऊ
मैत्रीचे छान गीत गाऊ
हसत खेळत अणि नाचत
रंगीबेरंगी फुलपाखरे पाहू

जिकडे तिकडे चोहीकडे
सुंदर फुलांची पडली सडे
सुंगध फुलांचा वेचून सारा
चला परतू या रे घराकडे
सुट्ट्या आहेत मजा करू
चला मित्रांनो खेळ खेळू

**– गिरीश वसेकर**
९४२२६५९४०९

## शाळेचा पहिला दिवस



रंगबिरंगी पताका
तोरण फुगे कमानी
गंध तिलक औक्षण
प्रवेशद्वार सजले.....

नूतन प्रवेश माझा
आनंदे साजरा झाला
नवी शाळा नवे मित्र
सारेच नवीन होते......।।

नव्या बाई नवा वर्ग
बसण्या मिळाला बेंच
बोलक्या भिंती छान
वाढवू शाळेची शान.....।।

पहिल्या दिवशी मिळाला
खास शिरा आणि वडा
नवी पुस्तके हाती पडता
आनंद पोटात मावेना.....।।

**– दत्ता तरलगट्टी**
पंढरपूर

## चिवडा



आमच्या बाबांनी चिवडा आणला
आहे एकदम कुरकुरीत चांगला
चिवड्यात होते बदाम काजु
खा मित्रांनो नका एवढे लाजू
चिवड्यामध्ये कुरकुरे
चिवड्यामध्ये मुरमुरे
चिवड्यामध्ये भेळ होती
बघा त्यात शेंगदाणे किती?
खमंग भेळ चिवड्यात टाकली
बारीक चिरून कैरीही टाकली
भेळीत वरून शेवही पेरली
सर्वांना ती खूपच भावली
काकांनी आणली बुंदी डब्यात
खाण्यास बसले सगळे थाटात
बुंदी संपली एका मिनिटात
नव्हते इथे कोणीच धाकात
बुंदीमध्ये होते दोन प्रकार
खारी बुंदी अन गोड प्रकार
बुंदी भेळ चिवडा प्रकार
सारे झोपले देऊन ढकार

**– अलकानंतसूत श्रीपाद दसरे.**
छ.संभाजीनगर
मो.९९७५९५०८०१

## मराठी भाषेची वाढवा गोडी, सोडवून बघा जूनी शब्दकोडी ,!

शब्दकोड १ – बत्तीस पिंपळाच एकच पान,,, काय बर असेल??
**उत्तर– जीभ**

शब्दकोडे २ – काळी गाय, काटे खाय पाण्याला पाहून, उभी राह्य
**उत्तर– चप्पल, वाहाणा**
जुन्या काळामध्ये चामड्यापासून बनवलेल्या चपला वापरत त्यांना वाहाणा असे म्हणत असत या वाहना पाण्यामुळे फुगत असत, त्यामुळे पाणीमध्ये त्या वापरता येत नसत.

शब्दकोडे ३– अतिंग मोर पतिंग मोर शेपटीने पाणी पितो पक्षी कोण?
**उत्तर – कंदिल, रॉकेलची, तेलाची चिमणी**
कंदीलामध्ये वात असते आणि ह्या वातीचे एक टोक उजेड देते तर दुसरे रॉकेलमध्ये डुंबलेले असते म्हणून तो शेपटीने पाणी पिणारा पक्षी आहे असे कोड्यात सुचवले आहे.

शब्दकोडे चार – चार तुर तुरे दोन भुरभुरे एक डांकचीक डडांग,
**उत्तर – कुत्रा**
चार तुर्तुरे म्हणजे चार पाय दोन भुरभुरे म्हणजे दोन कान आणि एक डांगचीक डडांग म्हणजे त्याची शेपटी

**संकलन**
**सौ. मनोरमा भारत बोराडे**